POSTAL REGISTRATION : PLG/255/2026-2028

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०५ ● अंक-२१७ ● मुंबई, बुधवार, ११ मार्च २०२६ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

## इराण-इस्त्रायल युद्धाचा महाराष्ट्राला फटका!

### मुंबईतील 20 टक्के हॉटेल बंद, पुण्यात गॅस दाहिन्या बंद, छ. संभाजीनगरमधील उद्योग ठप्प




**मुंबईतील हॉटेल उद्योग बंद पडण्याच्या मार्गावर**

मुंबईतील हॉस्पिटॅलिटी क्षेत्रालाही ऊर्जा संकटाचा सामना करावा लागत आहे, व्यावसायिक एलपीजी सिलिंडरच्या तीव्र कमतरतेमुळे सुमारे 20 टक्के हॉटेल्स आणि रेस्तराँना त्यांचं कामकाज बंद करावे लागले आहे. दादर, अंधेरी आणि माटुंगा सारख्या भागातील प्रतिष्ठित रेस्तराँनी आधीच त्यांच्या मेनूमध्ये कपात करण्यास सुरुवात केली आहे. दाल मखनी किंवा रवा डोसा सारखे हळूहळू शिजवलेले पदार्थ वगळण्यास सुरुवात झाली आहे. उरलेले गॅस साठे वाचवण्यासाठी त्यांनी त्यांचे कामकाजाचे तास देखील कमी केले आहेत. काही रेस्तराँ चालकांनी गॅसपुरवठा सुरु तोपर्यंत ग्राहकसेवा सुरु ठेऊ मात्र, त्यानंतरचे कोणतेच नियोजन नसल्याचे सांगितलं आहे. याबाबत हॉटेल व्यवसायिकांच्या आहार संघटनेकडून कोणतेही अधिकृत स्पष्टीकरण दिले जात नसल्यानं गोंधळाची स्थिती निर्माण झाली आहे.

■ **बातमी /लेख,प्रीती दिपक नाईक**

इराण-इस्त्रायलमध्ये सुरु असलेल्या युद्धाचे पडसाद आता भारतातही उमटू लागले आहेत. बंगळुरु, चेन्नई आणि मुंबईतील हॉटेल उद्योगावर आता त्याचा परिणाम दिसू लागला आहे. अनेक ठिकाणी गॅसचा तुटवडा निर्माण झाला असून, हॉटेल उद्योगांसमोर संकट निर्माण झालं आहे. मध्य पूर्वेतील युद्धामुळे पुरवठा खंडित झाला असून बंगळुरु, चेन्नई आणि मुंबई येथील हॉटेल आणि रेस्तराँ उद्योगांनी व्यावसायिक स्वयंपाकाच्या गॅस सिलिंडरची कमतरता जाणवत असल्याचं सांगितलं आहे. दरम्यान केंद्राने तेल शुद्धीकरण कारखान्यांना एलपीजीचं उत्पादन वाढवण्याचे आदेश दिले आहेत.

आहार संघटनेने दिलेल्या माहितीनुसार, मुंबईतील जवळपास 20 टक्के हॉटेल्स बंद ठेवण्यात आली आहेत. परिस्थिती कायम राहिल्यास आगामी दिवसांत परिस्थिती आणखी चिघळण्याची शक्यता आहे.

इराण-इस्रायल-अमेरिका युद्ध आणि त्यामुळे होर्मुझच्या सामुद्रधुनीसह प्रमुख ऊर्जा वाहतूक मार्गांमध्ये झालेल्या व्यत्ययामुळे शनिवारी एलपीजी सिलिंडरच्या किमतीतही वाढ करण्यात आली. घरगुती स्वयंपाकाच्या गॅसचे दर 60 रुपयांनी आणि व्यावसायिक एलपीजी सिलिंडरचे दर 115 रुपयांनी वाढवण्यात आले आहेत.

आहार संघटनेने अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांची भेट घेतली आहे. गॅस पुरवठा पूर्णपणे बंद करू नये अशी मागणी त्यांनी निवेदन देत केली आहे. छढक्ष पुरवठादार जास्तीत जास्त 25 टक्के कपात झाली तरी उद्योग काही प्रमाणात त्याचे व्यवस्थापन करू शकतो. 100 टक्के पुरवठा बंद केल्यास हॉटेल्स व रेस्तराँ आपले व्यावसायिक कामकाज चालू ठेऊ शकणार नाही. त्यामुळे किमान आवश्यक एलपीजी पुरवठा सुरू राहील यासाठी हस्तक्षेप करावा अशी मागणी आहार संघटनेच्या वतीने करण्यात आली आहे.

**संभाजीनगरमधील उद्योगांना फटका :** छत्रपती संभाजीनगरमध्ये एलएनजीच्या तुटवड्याचा उद्योगांना फटका बसला असून, एलएनजीअभावी 5 मोठ्या उद्योगांचं उत्पादन ठप्प झालं आहे. एमआयडीसीमधील आणखी उद्योग ठप्प होण्याची शक्यता आहे. शेंद्रा, वाळूज, चिखलठाण्यातही ऑटोमोबाईललाही गॅस तुटवड्याचा फटका बसत आहे. याशिवाय एलएनजीच्या तुटवड्यामुळे स्टील कंपनीत युनिट बंद पडण्याच्या मार्गावर आहेत.

**पुण्यातील 22 गॅस दाहिन्या बंद :** आखाती देशांतील युद्धाच्या पार्श्वभूमीवर गॅस पुरवठा कमी झाल्याने पुणे महापालिकेच्या स्मशानभूमींतील 22 गॅस दाहिन्या बंद ठेवाव्या लागल्या आहेत. वैकुंठ स्मशानभूमीतील तीन दाहिन्यांसह शहरातील इतर 19 दाहिन्या गेल्या दोन दिवसांपासून बंद आहेत. याठिकाणी दररोज सुमारे २० ते २२ पार्थिवांवर अंत्यसंस्कार होत होते. केंद्र सरकारने घरगुती गॅस पुरवठ्याला प्राधान्य दिल्याने व्यावसायिक गॅस कमी झाला आहे. गॅस पुरवठा सुरळीत झाल्यानंतर दाहिन्या पुन्हा सुरू करण्यात येतील.

**कोल्हापुरात गॅस सिलेंडर घेण्यासाठी गर्दी :** इराण-इस्रायल युद्धाच्या पार्श्वभूमीवर देशभरात इंधन टंचाईची भीती व्यक्त केली जात असताना कोल्हापुरातही त्याचे पडसाद उमटताना दिसत आहेत. घरगुती गॅस सिलेंडर भडकण्याची किंवा पुरवठा कमी होण्याची शक्यता व्यक्त करत नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या पार्श्वभूमीवर आज कोल्हापूर शहरातील राजारामपुरी इथे असणाऱ्या गॅस एजन्सी समोर नागरिकांची मोठी गर्दी पाहायला मिळाली. सकाळपासूनच सिलेंडर मिळवण्यासाठी नागरिकांनी एजन्सीच्या दारात लांबच लांब रांगा लावल्या. आपल्याला वेळेत गॅस मिळावा यासाठी अनेक जण सिलेंडर घेण्यासाठी घाई करताना दिसले.

## अल्पवयीन मुलीचं शोषण करत धर्मांतरासाठी दबाव

### भिवंडीतील संतापजनक प्रकार समोर



**विवाहासाठी दबाव आणि 'निकाह'चा घाट**

गेल्या महिन्यात पीडित मुलगी १८ वर्षांची झाल्यावर आरोपीनं तिच्यावर लग्नासाठी (निकाह) दबाव टाकण्यास सुरुवात केली. त्यासाठी त्याने तिला ब्लॅकमेलही केल्याचं पोलीस तपासात समोर आलं आहे. ६ मार्च रोजी निकाहसाठी मुलगी भिवंडीत पोहोचली होती. पण, एका हिंदुत्ववादी संघटनेला याची कुणकुण लागली आणि त्यांनी मुलीच्या नातेवाईकांना या घटनेची माहिती दिली. यानंतर हा धक्कादायक प्रकार उघडकीस आला.

■ **भिवंडी। प्रतिनिधी,**

सोशल मीडियाच्या माध्यमातून मैत्री करून एका अल्पवयीन मुलीचं लैंगिक शोषण करणाऱ्या आणि तिला आंतरधर्मीय विवाहासाठी धमकावणाऱ्या २० वर्षीय तरुणाला पोलिसांनी अटक केली आहे. भिवंडीत टेलर म्हणून काम करणाऱ्या तरुणाने संबंधित मुलीवर अत्याचार करून तिला धर्मांतरासाठी भाग पाडल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, २०२४ मध्ये आरोपी आणि पीडित मुलगी यांची सोशल मीडियाच्या माध्यमातून ओळख झाली होती. त्यावेळी आरोपी १८ वर्षांचा होता, तर मुलगी अल्पवयीन होती. हळूहळू या मैत्रीचे रूपांतर प्रेमसंबंधात झाले. मात्र, आरोपीने तिच्या अल्पवयीन असण्याचा फायदा घेऊन तिच्यावर वारंवार शारीरिक अत्याचार केल्याचा आरोप आहे. गेल्या दोन वर्षांपासून हे शोषण सुरू होतं.

**निकाहचा पर्दाफाश**

विवाहाचा विधी (निकाह) पार पडण्यापूर्वीच हिंदुत्ववादी संघटनेच्या कार्यकर्त्यांनी घटनास्थळी धाव घेत मुलीची तिथून सुटका केली. त्यानंतर मुलीला स्थानिक पोलीस ठाण्यात नेण्यात आलं. मुलीच्या तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपासासाठी हे प्रकरण संबंधित पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आलं आहे.

डोंबिवली पोलिसांनी आरोपीला पॉक्सो कायदा आणि भारतीय दंड संहितेच्या विविध कलमान्वये अटक केली आहे. हा गुन्हा २०२४ मध्ये घडल्याने, नवीन भारतीय न्याय संहितेऐवजी आयपीसी अंतर्गत कलमे लावण्यात आली आहेत. सहायक पोलीस आयुक्त सुहास हेमाडे यांनी दिलेल्या माहितीनुसार, शारीरिक संबंध प्रस्थापित झाल्यानंतर आरोपी मुलीवर लग्नासाठी सातत्याने दबाव आणि ब्लॅकमेलिंग करत होता. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस करत असून, यामागे आणखी कोणाचा हात आहे का? याचा शोध घेतला जात आहे.

## राज्यातील प्रलंबित मुद्रांक प्रकरणांचा निपटारा जलद

### 'महाराष्ट्र मुद्रांक सुधारणा विधेयक २०२६' मंजूर

**सुधारित आर्थिक मर्यादा खालीलप्रमाणे**

- जिल्हाधिकारी (मुद्रांक) - ५ लाख रुपये वाढ करुन २० लाख रुपये.
- नोंदणी उपमहानिरीक्षक (मुंबई वगळून) - २० लाख रुपये वाढ करून ५० लाख रुपये.
- अप्पर मुद्रांक नियंत्रक (मुंबई) - २० लाख रुपये वाढ करुन १ कोटी रुपये.
- मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकारी - २० लाख रुपये वाढवून १ कोटी रुपये.

■ **मुंबई। प्रतिनिधी,**

राज्यातील मुद्रांक शुल्क विभागातील प्रलंबित प्रकरणांचा निपटारा जलद गतीने होण्यासाठी तसेच, प्रशासकीय कामात सुसूत्रता आणण्यासाठी महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मांडलेले 'महाराष्ट्र मुद्रांक सुधारणा विधेयक २०२६' आज विधिमंडळात एकमताने मंजूर करण्यात आले.



स्थानिक स्तरावरील अधिकाऱ्यांच्या आर्थिक अधिकारात मोठी वाढ करण्यात आल्याने मुद्रांक शुल्काशी संबंधित प्रकरणांच्या निर्णयासाठी आता नोंदणी महानिरीक्षक स्तरावर जाण्याची गरज पडणार नाही.

सध्याच्या कायद्यातील कलम ५२ 'अ' मध्ये सुधारणा करून प्रशासकीय अधिकारांचे विकेंद्रीकरण करण्यात आले आहे. यामुळे नोंदणी महानिरीक्षकांकडे येणारा कामाचा ताण कमी होऊन स्थानिक स्तरावरच निर्णय होतील.

**सामान्यांची 'तारीख पे तारीख' थांबणार**

विधेयकावर बोलताना महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, ॅसध्या अनेक केसेस केवळ आर्थिक मयार्दा कमी असल्यामुळे राज्याच्या नोंदणी महानिरीक्षकांकडे प्रलंबित राहतात. यामुळे नागरिकांना मुंबईला चकरा माराव्या लागतात आणि मोठा मनस्ताप सहन करावा लागतो. आता जिल्हाधिकारी आणि उपमहानिरीक्षक स्तरावरच मोठ्या रकमेच्या प्रकरणांचा निकाल लावता येईल. यामुळे पारदर्शकता येईल आणि प्रलंबित कामांचा डोंगर लवकर उपसला जाईल.ॅ हे विधेयक क्र. ९ (२०२६) विधानसभेत मांडण्यापूर्वीच विधान परिषदेनेही याला संमती दिली होती. आज विधानसभेत विधेयक खंडशः विचारात घेऊन ते बहुमताने संमत करण्यात आले. यासोबतच 'महाराष्ट्र जमीन महसूल संहिता सुधारणा विधेयक २०२६' (विधेयक क्रमांक २) देखील सभागृहात मांडण्यात आले. या ऐतिहासिक सुधारणेमुळे महसूल विभागाच्या कामात गती येणार असून, मालमत्ता खरेदी-विक्री व्यवहारातील तांत्रिक अडचणी लवकर सुटण्यास मदत होणार आहे.

**उन्हाळा सुरू तरी पाणपोया बंदच तहानलेल्या नागरिकांची गैरसोय**

उन्हाळ्याची तीव्रता वाढत असताना तहानलेल्या नागरिकांना दिलासा देण्यासाठी उभारलेल्या शहरातील अनेक पाणपोया मात्र बंद अवस्थेत असल्याचे चित्र समोर आले आहे. कडक उन्हातही पिण्याच्या पाण्याची सोय नसल्यामुळे नागरिकांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत असून या पाणपोया तातडीने सुरू कराव्यात अशी मागणी होत आहे.

विरार शहरात विविध ठिकाणी उन्हातान्हाने त्रस्त झालेल्यांना मोफत पाणी मिळावे या उद्देशाने पाणपोया उभारण्यात आल्या होत्या. मात्र सध्या त्यापैकी बहुतांश पाणपोया बंद पडल्या असून त्यांची योग्य देखभाल होत नसल्याचे दिसून येत आहे. हजारो रुपये खर्च करून उभारण्यात आलेल्या या पाणपोया बंद असतानाच त्या ठिकाणी जाहिराती तसेच फेरीवाल्यांचे अतिक्रमण झाल्याचेही आढळून आले आहे.

वसई-विरार महापालिकेच्या इमारतीजवळ निमाताई ठाकरे यांच्या नावाने उभारण्यात आलेली पाणपोई देखील दुर्लक्षामुळे जीर्ण अवस्थेत असल्याचे दिसून येते. या पाणपोईच्या परिसरात फेरीवाल्यांनी अतिक्रमण करून भाजीपाला ठेवण्यासाठी जागा तयार केली असल्याचे नागरिकांनी सांगितले. त्यामुळे ही पाणपोई पुन्हा सुरू करून परिसर स्वच्छ करण्याची मागणी होत आहे.

विरार बसस्थानक, रेल्वे स्थानक परिसर, विरार पोलीस ठाणे तसेच विरार पूर्वेतील गणपती मंदिर परिसरात मोठ्या पाणपोया उभारण्यात आल्या आहेत. मात्र सध्या या सर्व पाणपोया बंद असल्याने त्या केवळ अशाच उभ्या आहेत. उन्हाच्या तीव्रतेत बाहेरून येणाऱ्या नागरिकांनाही पिण्याच्या पाण्याची सोय नसल्याने अडचणी निर्माण होत आहेत. त्यामुळे शहरातील मुख्य ठिकाणी पाणपोया तातडीने सुरू कराव्यात अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

## विजेचा लपंडाव... नागरिक उकाड्याने त्रस्त



■ **वसई। प्रतिनिधी,**

उन्हाळ्याची चाहूल लागताच वसई-विरार शहरात विजेचा लपंडाव पुन्हा सुरू झाला असून वाढत्या उकाड्यामुळे नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. मार्च महिन्यापासून तापमानात हळूहळू वाढ होत असून दुपारच्या वेळी उकाडा आणि आर्द्रता दोन्ही वाढत असल्याने नागरिकांना घरातही अस्वस्थता जाणवत आहे. पंखे, कुलर आणि एसीचा वापर वाढलेल्या काळातच वारंवार वीज खंडित होत असल्याने नागरिक अक्षरशः हैराण झाले आहेत. विशेषत दुपार आणि रात्रीच्या वेळी वीज गेल्यास लहान मुले ज्येष्ठ नागरिक तसेच रुग्णांना अधिक त्रास सहन करावा लागत असल्याची तक्रार नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

वसई- विरार शहरात दरवर्षी उन्हाळा सुरू होताच वीज खंडित होण्याच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याचे चित्र दिसून येते. मार्च ते मे या कालावधीत उष्णतेची तीव्रता वाढत असताना वीज पुरवठ्यातील अडथळे नागरिकांसाठी मोठी समस्या ठरतात. शहरातील अनेक भागांमध्ये विजेच्या तारा अद्याप भूमिगत नसल्यामुळे तांत्रिक बिघाड, ओव्हरलोड किंवा इतर कारणांमुळे वारंवार वीज खंडित होत असल्याचे सांगितले जाते. वीज जाण्याचे कोणतेही निश्चित वेळापत्रक नसल्याने दिवस-रात्र कधीही वीज खंडित होते आणि त्यामुळे नागरिकांचे दैनंदिन जीवन विस्कळीत होते.

शहरात नागरीवस्तीसोबतच औद्योगिक क्षेत्रही मोठ्या प्रमाणात असल्याने वीजपुरवठा खंडित झाल्यास उद्योगधंद्यांनाही फटका बसतो. उत्पादन प्रक्रिया थांबणे, यंत्रसामग्री बंद पडणे यामुळे उद्योजकांचे आर्थिक नुकसान होत असल्याच्या तक्रारीही समोर येत आहेत. दुसरीकडे वारंवार वीज खंडित होत असतानाही नागरिकांना मोठ्या प्रमाणात वीजबिले येत असल्याने नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण आहे.

दरम्यान, नागरिकांच्या वाढत्या तक्रारींची दखल घेत वसई-विरार महापालिकेत महावितरणच्या अधिकाऱ्यांसोबत महत्वाची बैठक पार पडली. या बैठकीस महापौर अजीव पाटील आणि उपमहापौर मार्शल लोपीस उपस्थित होते. बैठकीत शहरातील विविध भागांमध्ये उद्भवणाऱ्या वीज समस्यांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. तसेच वीजपुरवठा अधिक सक्षम करण्यासाठी आणि भविष्यात वारंवार

### मुस्लीम व्यावसायिकाशी प्रेमविवाह, धर्मांतरण, चार मुलं आणि छळ

## हिंदू धर्मात घरवापसी केलेल्या सायली सुर्वेचं प्रकरण काय?



**सायलीचा नेमका आरोप काय आहे?**

सायली सुवेर्ने 2019 मध्ये आतिफ तासे सोबत लग्न केलं होतं. मात्र कुटुंबाचा या लग्नाला विरोध होता. सायलीने हा विरोध झुगारुन आतिफशी लग्न केले. लग्नानंतर तिचं नाव अतेझा असं करण्यात आलं. मात्र तिचा ह्या निर्णयामुळे तिला बराच त्रास सहन करावा लागला. सायलीने सांगितले की, आतिफ तासेशी लग्न करणं ही तिच्या आयुष्यातील सर्वात मोठी चूक होती. लग्नानंतर काही काळातच तिचा छळ सुरु झाला. तसेच तिचे धर्मांतरण ही करण्यात आल्याचा आरोप सायलीने केला आहे.

■ **मुंबई। प्रतिनिधी,**

2019 ची मिस इंडिया अर्थ स्पर्धेतील सुंदरी, सायली सुर्वे हिचं शुद्धीकरण करून तिला हिंदू धर्मात सामावून घेण्यात आलंय. पिंपरी चिंचवडमधील रहिवासी असलेल्या सायलीन 2019 मध्ये मीरा भाईंदर शहरातील प्रसिद्ध उद्योजक आतिफ तासे सोबत घरच्यांचा विरोध झुगारून लग्न केलं होतं. मात्र आतिफ तासेशी लग्न करणे आपली चूक होती, लग्न झाल्यानंतर सतत आपला छळ केला गेला आणि धर्मांतरण देखील केलं गेलं असा आरोप सायलीने केलाय.

**पोलिसांकडून प्रतिसाद नाही**

या बाबत अनेकवेळा आपण पोलिसांकडे तक्रार केली होती, मात्र त्यांच्याकडून प्रतिसाद मिळाला नसल्याचं सायलीनं सांगितलं. बराच काळ त्रास सहन केल्यानंतर आणि पोलिसांकडूनही प्रतिसाद न मिळाल्याने सायलीने हिंदुत्त्ववादी संघटनांशी संपर्क साधला. यानंतर सायलीला परत हिंदू धर्मात घेण्यासाठी अशा पद्धतीने होम हवन मंत्रोच्चार करण्याची प्रक्रिया राबवली गेली. या शुद्धीकरण प्रक्रियेदरम्यान तिचं पुन्हा एकदा नामकरण करण्याल आलं. यावेळी तिला 'आद्या सुर्वे' हे नावं देण्यात आलं आहे.

**कृपा करुन त्रास सहन करु नका**

सायलीने सांगितलं की, ज्या मुली असा प्रकार सहन करत असतील त्यांनी तसं करु नये. देवाने अशा रावणांसमोर हारुन जाण्यासाठी आपल्याला आयुष्य दिलेलं नाही. मला ४ मुलं असल्यामुळं मी खचून गेले होते. मुलांकडे पाहून आई कधीच घर तुटावं असा विचार करत नाही. याच विचारात मी १० वर्ष काढली. मात्र माणूस म्हणून माझा संयम संपला होता. मी माझ्या मुलांसाठी बाहेर पडले.

## होळीच्या दिवशी एका आठ वर्षांच्या अनाथ चिमुकलीवर नातेवाईकाचाच अत्याचार

■ **गडचिरोली। प्रतिनिधी,**

गडचिरोली जिल्ह्यातून माणुसकीला काळिमा फासणारी संतापजनक घटना समोर आली आहे. कोरची तालुक्यात एका आठ वर्षांच्या अनाथ चिमुकलीवर तिच्याच नात्यातील २२ वर्षीय तरुणाने लैंगिक अत्याचार केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. होळीच्या सणाच्या दिवशी घडलेली ही घटना तब्बल पाच दिवसांनी उघडकीस आली असून परिसरात संताप व्यक्त होत आहे.

**होळीच्या दिवशी फूस लावून घरात नेले अन...**

पीडित मुलगी अनाथ असून सध्या ती आपल्या मामा-मामीकडे राहत आहे. होळीच्या दिवशी गावात सणाचा उत्साह सुरू असताना, आरोपीने मुलीला फूस लावून आपल्या घरी नेले. नात्यातीलच असलेल्या २२ वर्षीय तरुणाने तिच्या असहायतेचा फायदा घेत तिच्यावर अत्याचार केला. घडलेली घटना कुणाला सांगितल्यास जिवे मारण्याची धमकी देत आरोपीने मुलीला गप्प बसण्यास भाग पाडल्याचेही समोर आले आहे.

**पोलिसांची तातडीने कारवाई**

घटनेची माहिती मिळताच कोरची पोलिसांनी तातडीने तपास सुरू करून आरोपीला अटक केली. पीडित मुलीची वैद्यकीय तपासणी करण्यात आली असून, आरोपीविरुद्ध पोक्सो कायद्यांतर्गत विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अनाथ मुलीवर झालेल्या या घटनेमुळे परिसरात संताप व्यक्त होत असून, आरोपीला कठोर शिक्षा व्हावी, अशी मागणी नागरिकांकडून के ली जात आहे.



**पाच दिवसांनी उघड झाला प्रकार**

आरोपीच्या भीतीमुळे पीडित मुलगी काही दिवस गप्प राहिली. मात्र काही दिवसांनी मामी तिला आंघोळ घालत असताना तिच्या शरीरावर जखमांच्या खुणा आणि पोटावर सूज दिसून आली. त्यामुळे संशय आल्याने मामीने तिला विश्वासात घेत विचारपूस केली. तेव्हा त्या चिमुरडीने तिच्यासोबत घडलेला प्रकार सांगितला. हे ऐकताच कुटुंबीयांना मोठा धक्का बसला.

## चॅट जीपीटीला विचारलं आत्महत्या कशी करायची?

### शेवटी दोन्ही तरुणींचा मृतदेह मंदिराजवळच्या बाथरुममध्ये आढळला

■ **मुंबई। प्रतिनिधी,**

दिंडोली परिसरातील स्वामीनारायण मंदिर संकुलातील बाथरूममध्ये दोन तरुण मुलींचे मृतदेह आढळल्याने संपूर्ण परिसरात खळबळ उडाली आहे. रोशनी शिरसाठ आणि ज्योत्स्ना चौधरी अशी या मृत मुलींची नावे असून त्या एकमेकींच्या बालपणीच्या मैत्रिणी होत्या. या दोन्ही मुलींनी चॅट जीपीटीचा वापर करून आत्महत्येची पद्धत शोधल्याचे प्राथमिक तपासात निष्पन्न झाले असून तंत्रज्ञानाचा असा भयानक वापर समोर आल्याने पोलीस प्रशासनही चक्रावून गेले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार रोशनी आणि ज्योत्स्ना या दोघी दिंडोली येथील रामी पार्क सोसायटीत वास्तव्यास होत्या. त्या दररोज एकत्रच कॉलेजला जात असत. घटनेच्या दिवशी कॉलेजची वेळ संपूनही त्या घरी न परतल्याने त्यांच्या कुटुंबीयांची चिंता वाढली. पालकांनी त्यांच्या मोबाईलवर वारंवार संपर्क साधण्याचा प्रयत्न केला मात्र दोघींनीही फोन उचलले नाहीत. अखेर परिस्थितीचे गांभीर्य ओळखून कुटुंबीयांनी पोलिसांकडे धाव घेतली आणि तक्रार दाखल केली. पोलिसांनी तातडीने तपास चक्रावून मोबाईल लोकेशनचा शोध घेण्यास सुरुवात केली.

मोबाईल सर्व्हिलन्सच्या मदतीने तपास केला असता दोन्ही मुलींचे लोकेशन सनिया कणदे येथील स्वामीनारायण मंदिर परिसरात दाखवत होते. पोलीस आणि मुलींचे कुटुंबीय तातडीने मंदिर परिसरात पोहोचले तेव्हा तिथे त्यांची मोपेड उभी असलेली आढळली परंतु मुलींचा कुठेच पत्ता लागत नव्हता. त्यानंतर पोलिसांनी मंदिरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले असता त्या दोघी मंदिरातील बाथरूमच्या दिशेने जाताना दिसल्या. बाथरूमचा दरवाजा आतून बंद असल्याने संशय बळावला आणि पोलिसांनी तो तोडला असता दोघींचे मृतदेह तिथे पडलेले होते.



घटनास्थळाचा पंचनामा करताना पोलिसांना मृतदेहांच्या शेजारी क्लोरोफॉर्मची एक भरलेली आणि एक रिकामी बाटली तसेच इंजेक्शनची सिरिंज सापडली आहे. या दोन्ही मुलींनी स्वतःला विषारी इंजेक्शन टोचून जीवनयात्रा संपवल्याचा प्राथमिक अंदाज वर्तवला जात आहे. पोलिसांनी दोन्ही मृतदेह शवविच्छेदनासाठी रुग्णालयात पाठवले असून घटनास्थळावरून जप्त केलेले साहित्य एफएसएलकडे तपासणीसाठी पाठवण्यात आले आहे. या अहवालानंतरच त्यांच्या मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होणार आहे. ही घटना गुजरातमधील सूरत शहरात घडलीये.

सुरतचे एसीपी नीरव सिंह गोहिल यांनी दिलेल्या माहितीनुसार, या मुलींच्या मोबाईलच्या प्राथमिक तपासणीत अत्यंत धक्कादायक माहिती समोर आली आहे. या मुलींनी आत्महत्येसाठी कोणत्या विषाचा वापर करावा आणि ते कसे घ्यावे याची माहिती चॅट जीपीटीवर शोधली होती. इतकेच नव्हे तर त्यांच्या मोबाईलमध्ये दिंडोली परिसरातील एका अन्य मुलीच्या आत्महत्येची प्रेस नोट देखील सापडली आहे ज्या मुलीने भूल देणारे औषध घेऊन आत्महत्या केली होती. या संपूर्ण घटनेचा पोलीस अधिक तपास करत असून या प्रकरणाने पालकांमध्ये मोठी चिंता निर्माण केली आहे.



संपादकीय

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

# नेपाळ हिंदु राष्ट्र होण्याची शक्यता अल्पच!



गेल्या अनेक दशकांपासून राजकीय अस्थिरतेच्या गर्तेत अडकलेल्या नेपाळमध्ये अखेर जनशक्तीचा महास्फोट झाला आहे. सार्वत्रिक निवडणुकीत नेपाळच्या जनतेने जुन्या, भ्रष्ट आणि परकीय शक्तींच्या तालावर नाचर्णाया प्रस्थापित राजकीय पक्षांना पूर्णपणे नाकारले आहे. माजी पंतप्रधान के.पी. शर्मा ओली यांचा दारूण पराभव करत तरुण नेते बालेन (बालेंद्र) शाह आणि त्यांच्या 'राष्ट्रीय स्वतंत्र पार्टी'ने (आर.एस्.पी.ने) मिळवलेला विजय हा केवळ सत्तापालट नसून नेपाळच्या राजकीय मानसिकतेतील मोठे परिवर्तन आहे. यापूर्वीर्ची के.पी. शर्मा ओली आणि पुष्पकमल दहल प्रचंड यांची सरकारे उघडपणे चीनच्या कच्छपि लागली होती. 'ड्रॅगन'च्या विस्तारवादी धोरणाला बळी पडत या नेत्यांनी नेपाळच्या भूमीवर चीनला हस्तक्षेप करण्याची मोकळीक दिली. भारत-नेपाळ यांमधील रोटी-बेटीचे संबंध आणि सांस्कृतिक वारसा विसरून ही सरकारे नकाशावाद आणि सीमावाद यांद्वारे भारताशी शत्रुत्व पत्करत होती. साम्यवादी विचारसरणीमुळे नेपाळमधील हिंदु संस्कृतीला गौण स्थान देण्याचा प्रयत्न झाला, ज्यामुळे जनमानसात प्रचंड असंतोष होता. तो त्यांनी निवडणुकीतून बाहेर काढला आणि साम्यवादी विचारसरणीच्या नेत्यांना आणि त्यांच्या पक्षांना धुडकावून लावले. आता काठमांडूचे महापौर म्हणून स्वतःच्या कामाचा ठसा उमटवणारे ३५ वर्षीय बालेन शाह नेपाळचे पंतप्रधान होत आहेत. ते पहिले 'मधेसी' (नेपाळच्या दक्षिणेला भारताच्या सीमेजवळील प्रांतात रहाणारे) पंतप्रधान ठरणार आहेत. ही घटना भारतासाठी अत्यंत महत्त्वाची असली, तरी बालेन शाह यांची आतापर्यंत भारताच्या संदर्भातील विधाने आणि वागणूक पहाता त्यांचे भारताशी किती जमू शकते? हा प्रश्न आहे. त्यातच नेपाळमध्ये बालेन शाह यांचा झालेला अचानक उदय हा अनेक संशयांना जन्म देणारा आहे. बालेन यांच्या प्रचाराची पद्धत आणि सामाजिक माध्यमांचा वापर पहाता यामागे अमेरिकेच्या समर्थक शक्तींचा हात असल्याची दाट शक्यता आहे. चीनला रोखण्यासाठी अमेरिकेने नेपाळमध्ये असे नेतृत्व उभे केले आहे का? जे भारताच्याही पूर्णपणे नियंत्रणात नसेल? हा एक गंभीर प्रश्न आहे. काठमांडूचे महापौर असतांना आणि त्यापूर्वीही बालेन शाह यांनी अनेकदा प्रक्षोभक विधाने करून नेपाळी तरुणांमध्ये भारताविरुद्ध संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे. भारताच्या नवीन संसदेत लावलेल्या 'अखंड भारत'च्या भित्तीचित्राला उत्तर म्हणून बालेन शाह यांनी त्यांच्या कार्यालयात 'ग्रेटर नेपाळ'चा नकाशा लावला होता. ज्यामध्ये भारताच्या उत्तराखंड आणि उत्तरप्रदेश राज्यांतील काही भागांचा समावेश होता. 'आदिपुरुष' या हिंदी चित्रपटातील सीतामातेच्या जन्माच्या संदर्भावरून त्यांनी संपूर्ण काठमांडूमध्ये भारतीय चित्रपटांवर बंदी घालण्याची घोषणा केली होती. हे केवळ सांस्कृतिक सूत्र नव्हते, तर त्यामागे स्वतःची 'कट्टर राष्ट्रवादी' प्रतिमा उभी करून भारताला डिवचण्याचा त्यांचा प्रयत्न होता. नेपाळच्या अंतर्गत घटनांमध्ये भारताचा हस्तक्षेप असल्याचे भासवून त्यांनी तिथल्या तरुणाईला भारताच्या विरोधात उभे केले आहे. बालेन शाह हुशार रणनीतीकार आहेत. त्यांना ठाऊक आहे की, नेपाळमध्ये सत्ता मिळवण्यासाठी 'भारत विरोध' हे सर्वांत सोपे शस्त्र आहे. पंतप्रधानपदी बसल्यानंतर ते मुत्सद्देगिरीचा भाग म्हणून भारताशी मैत्रीचे नाटक करतील; परंतु पडद्यामागे ते नेपाळची निर्भरता भारतावरून अल्प करण्यासाठी प्रयत्नशील रहातील, असे म्हटले जात आहे. बालेन चीनला जितका विरोध करतात, तितकेच ते अमेरिकेच्या जवळ जाण्याचा प्रयत्न करू शकतात. भारताला डावलून पाश्चात्त्य देशांशी थेट संबंध प्रस्थापित करणे, हे त्यांच्या धोरणाचे मुख्य सूत्र असू शकते. ते कोणत्याही एका महासत्तेचे (चीन किंवा अमेरिका) मांडलिक होण्यापेक्षा 'नेपाळ प्रथम' या धोरणाचे पुरस्कर्ता दिसतात. त्यांच्या कार्यकाळात नेपाळ पुन्हा आपल्या सांस्कृतिक मुळांकडे वळेल, अशी आशा हिंदु बांधवांना आहे. भारत सरकारने बालेन शाह यांच्या विजयाकडे केवळ 'सत्तापालट' म्हणून न पहाता एक 'धोरणात्मक आव्हान' म्हणून पहायला हवे. त्यांची भारतविरोधी विधाने केवळ निवडणुकीपुरती होती कि ती त्यांची कायमस्वरूपी धारणा आहे? हे लवकरच स्पष्ट होईल. बालेन हे स्वतः मधेसी पार्श्वभूमीचे असले, तरी त्यांनी काठमांडूच्या उच्चभ्रू वर्गाची मते मिळवण्यासाठी अनेकदा मधेसी हितांपेक्षा 'नेपाळी राष्ट्रवादा'ला महत्त्व दिले आहे., नेपाळमध्ये 'राष्ट्रीय प्रजातंत्र पार्टी'सारखे (आरपीपी) पक्ष उघडपणे हिंदु राष्ट्र आणि राजेशाही यांची मागणी करतात. बालेन शाह यांनी या मागणीला कधीही स्पष्ट विरोध केलेला नाही; पण त्यांनी उघड समर्थनही दिलेले नाही. जेव्हा नेपाळमध्ये हिंदु राष्ट्रासाठी मोठी आंदोलने होतात, तेव्हा बालेन शाह त्या आंदोलनांच्या विरोधात भूमिका घेत नाहीत; कारण त्यांना ठाऊक आहे की, त्यांचा मोठा तरुण मतदार हिंदु संस्कृतीशी जोडलेला आहे. ते स्वतःला आधुनिक आणि प्रगत विचारांचे मानतात. त्यामुळे पाश्चात्य जगाला उत्तर देतांना ते 'धर्मनिरपेक्ष' दर्शवण्याचा प्रयत्न करतात, तर स्थानिक जनतेत 'हिंदु संस्कृतीचे रक्षक' म्हणून वावरतात. भारतातील हिंदुत्व हे 'अखंड भारत' आणि 'सांस्कृतिक एकता' यांवर विश्वास ठेवते; मात्र बालेन शाह यांचे हिंदुत्व हे 'विभक्त' आहे. ते अशी मांडणी करतात की, 'नेपाळचे हिंदुत्व हे भारतापेक्षा वेगळे, श्रेष्ठ आणि प्राचीन आहे.' हिंदुत्वाच्या नावाखाली भारताशी जवळीक वाढवण्यापेक्षा ते भारताला 'नेपाळच्या धार्मिक विषयात हस्तक्षेप करणारा देश' म्हणून चित्रीत करतात. 'ग्रेटर नेपाळ'चा नकाशा लावणे ही त्यांची कृती याचेच निदर्शक आहे की, त्यांना हिंदु धर्माचा आधार घेऊन भारताच्या सीमांना आव्हान द्यायचे आहे. नेपाळमध्ये सध्या ८० टक्क्यांहून अधिक लोकसंख्या हिंदु आहे आणि 'धर्मनिरपेक्षता' हा शब्द राज्यघटनेतून हटवण्याची मागणी प्रचंड आहे. बालेन शाह पंतप्रधान झाल्यानंतर जर त्यांना त्यांची सत्ता टिकवण्यासाठी आरपीपी सारख्या हिंदुत्वनिष्ठ पक्षांच्या पाठिंब्याची आवश्यकता भासली, तर ते 'हिंदु राष्ट्र' किंवा 'सांस्कृतिक हिंदु राष्ट्र' या संकल्पनेला राज्यघटनेत स्थान देऊ शकतात; पण हे 'हिंदु राष्ट्र' भारताशी मैत्री करणारे नसेल, तर ते केवळ नेपाळी राष्ट्रवाद तीव्र करण्यासाठी वापरलेले एक साधन असेल. थोडक्यात सांगायचे, तर बालेन शाह आवश्यकतेनुसार हिंदुत्वाचा विचार मांडू शकतात. त्यांचे हिंदुत्व हे भारताशी जोडणारे नसून भारतापासून वेगळी ओळख निर्माण करणारे आहे. हीच गोष्ट सनातनप्रेमींनी आणि भारताने गांभीर्याने घेण्यासारखी आहे.

# सार्वभौमत्वावर आघात

फेब्रुवारी २०२६च्या शेवटच्या आठवड्यात काबूल आणि कंदाहारच्या आकाशात पाकिस्तानी बॉम्बचा वर्षाव झाला. हा गेल्या अनेक वर्षांतील अफगाणिस्तान आणि पाकिस्तान यांच्यातील सर्वांत भीषण सशस्त्र संघर्ष होता. पाकिस्तानचे 'ऑपरेशन गज्ब-उल-हक' - म्हणजे 'न्यायी प्रकोप', हे नाव स्वतःच्या कृत्यांना धार्मिक अधिष्ठान देण्याच्या जुन्या सवयीचे द्योतक. या मोहिमेंतर्गत अफगाणिस्तानातील वीसहून अधिक ठिकाणांवर हवाई हल्ले करण्यात आले. साठ लाख लोकसंख्येचे राजधानीचे शहर काबूल, तालिबानचे आध्यात्मिक केंद्र कंदाहार, आणि बगराम हवाई तळ - या सर्वांवर बॉम्बवर्षाव झाला. संरक्षणमंत्री ख्वाजा आसिफ यांनी ह्यखुले युद्धह्ल जाहीर केले. तालिबानने पाकिस्तानच्या सीमावर्ती लष्करी ठिकाणांवर जोरदार हल्ले करून प्रत्युत्तर दिले. दक्षिण आशिया आणखी एका दीर्घकालीन संघर्षाच्या उंबरठ्यावर उभा आहे. या संघर्षाचे परिणाम दोन शेजारी देशांच्या द्विपक्षीय भांडणापुरते मर्यादित राहणार नाहीत.

यामागील कारणे सर्वज्ञात आहेत. अफगाणिस्तान 'तालिबान तहरीक-ए-तालिबान पाकिस्तान' (टीटीपी) या दहशतवादी संघटनेला आश्रय देत आहे, असा पाकिस्तानचा आरोप आहे. टीटीपीने २०२५मध्ये पाकिस्तानात दहशतवादी हल्ल्यांमध्ये ३४ टक्क्यांची भीषण वाढ घडवून आणली, ज्यात एक हजारांहून अधिक लोक मारले गेले. नोव्हेंबरमध्ये इस्लामाबादमधील एका जिल्हा न्यायालयाबाहेर आत्मघाती हल्ला करून टीटीपीने सीमावर्ती टोळी भागांपलीकडे आपली पोहोच असल्याचे अधोरेखित केले. बलुचिस्तान लिबरेशन आर्मीने जानेवारीत बलुचिस्तान प्रांतात केलेल्या हल्ल्यांमध्ये जवळपास ५० लोकांचा बळी गेला. सुरक्षेबाबतचे हे वास्तव आहे आणि कोणताही गंभीर विश्लेषक पाकिस्तानच्या अंतर्गत स्थैयार्ला टीटीपीपासून असलेला धोका नाकारणार नाही.

परंतु याबाबतचा पाकिस्तानचा प्रतिसाद म्हणजे अफगाण शहरांवर बॉम्बवर्षाव करणं, हा अत्यंत असमतोल आणि रणनीतिकदृष्ट्या आत्मघाती आहे. संयुक्त राष्ट्रांच्या अफगाणिस्तान सहाय्यता मोहिमेने नांगरहारमधील बेहसूद आणि खोग्यानी जिल्ह्यांतील सुरुवातीच्या हवाई हल्ल्यांमध्ये महिला व मुलांसह किमान १३ नागरिक ठार झाले, याला दुजोरा दिला आहे. गिरडी कासमध्ये तर एका कुटुंबातील २३पैकी १८ जण एकाच हल्ल्यात मरण पावले. शाळेतील विद्यार्थी मारले गेले. मदरसे उद्ध्वस्त करण्यात आले. पाकिस्तान या हल्ल्यांना 'गुप्तचर माहितीवर आधारित निवडक कारवाया' म्हणत असेल, पण ढिगाऱ्यांखाली दबलेले मृतदेह वेगळीच कथा सांगतात... दशकांच्या युद्धामुळे, आर्थिक संकुचनामुळे आणि मोठ्या प्रमाणावरील विस्थापनामुळे आधीच उद्ध्वस्त झालेल्या नागरी लोकसंख्येला भोगावी लागलेली ही सामूहिक शिक्षा आहे.

अफगाणिस्तानचा प्रतिकार समजून घेण्यासाठी पाकिस्तान ज्या इतिहासावर पडदा टाकू इच्छितो त्याचा सामना करावा लागतो. ड्युरंड रेषा - सर मॉर्टिमर ड्युरंड यांनी १८९३ मध्ये आखलेला तो २,६४० किलोमीटरचा वसाहतवादी व्रण - कोणत्याही अफगाण सरकारने कधीही मान्य केली नाही. ही रेषा पश्तून आणि बलुच समुदायांना विभाजित करते, आणि म्हणूनच अफगाणिस्तान हा १९४७मध्ये पाकिस्तानच्या संयुक्त राष्ट्रांतील प्रवेशाच्या विरोधात मत देणारा एकमेव देश होता. राजेशाहीपासून सोव्हिएत-समर्थित सरकारपर्यंत, करझाईपासून तालिबानपर्यंत - प्रत्येक अफगाण राजवटीने या रेषेची आंतरराष्ट्रीय सीमा म्हणून वैधता नाकारली आहे.

पाकिस्तानचे तालिबानशी नाते नेहमीच कोरड्या व्यावहारिक पातळीवरचे होते. ते कधीच बंधुत्वाचे नव्हते. अमेरिकेच्या नेतृत्वाखालील युद्धात पाकिस्तानने तालिबानला आश्रय, रसद आणि रणनीतिक वजन दिले ते वैचारिक समरसतेमुळे नव्हे, तर अफगाणिस्तानवर पकड ठेवण्यासाठी आणि भारताचा प्रभाव रोखण्यासाठी.




पाकिस्तानने अफगाणिस्तावर जोरदार हल्ले सुरू केले आहेत. पाकिस्तानने अफगाण तालिबानला हस्तक म्हणून पोसले, टीटीपीच्या पूर्वसुरींना शस्त्रास्त्रे दिली, आणि भारताशी छुप्या युद्धासाठी अफगाण भूमी बुद्धिबळपटासारखी वापरली. आता तालिबान पाकिस्तानच्या इच्छेप्रमाणे टीटीपीवर कारवाई करत नाही. पाकिस्तानच्या स्वतःच्या लबाड धोरणांचा हा बुमरँग आहे.

आता तालिबानला जगण्यासाठी पाकिस्तानी संरक्षकत्वाची गरज उरली नसल्यामुळे इस्लामाबादचा दबाव निष्प्रभ झाला आहे. तालिबानचे टीटीपीवर कारवाई न करणे हे कार्यात्मक अक्षमतेचे चिन्ह नव्हे; त्यामागे वेगळी कारणे आहेत. तालिबान पाकिस्तानला एक उपकारकर्ता नव्हे, तर अफगाण सार्वभौमत्वाचा ऐतिहासिक हस्तक्षेपकर्ता मानतो, ही धारणा समजून घ्यायला हवी.

अफगाणिस्तानची डामाडौल आर्थिक स्थिती या अन्यायात भर घालते. हा भूपरिवेष्टित देश पारगमन व्यापारासाठी पाकिस्तानवर मोठ्या प्रमाणात अवलंबून आहे. पाकिस्तानने ऑक्टोबरपासून सीमा बंद करून सर्व व्यापार स्थगित केला. २०२५ मध्ये इराण आणि पाकिस्तानमधून अंदाजे २७ लाख अफगाण निर्वासितांची जबरदस्ती स्वदेशी परतपाठवणी करण्यात आली, ज्यामुळे अफगाणिस्तानच्या लोकसंख्येत २०२३ पासून बारा टक्क्यांनी वाढ झाली. पाकिस्तानने एका हातात आर्थिक कोंडी आणि दुसऱ्या हातात बॉम्ब घेऊन ज्या लोकसंख्येला उद्ध्वस्त केले त्यांच्यावरच हल्ला करतो. ही दहशतवादविरोधी कारवाई नव्हे - हे बळजबरीचे राजकारण आहे.

या संकटातील सर्वात महत्त्वपूर्ण भूराजनीतिक बदल म्हणजे तालिबानसोबत भारताचे विकसित होणारे संबंध. दशकांपूर्वी तालिबान पाकिस्तानी हस्तक असल्याचे भारत मानत होता, आणि त्यात तथ्य होते. नव्वदच्या दशकातील तालिबानने लष्कर-ए-तैय्यबा आणि जैश-ए-मोहम्मद यांसारख्या पाकिस्तान-पुरस्कृत गटांना आश्रय दिला होता. भारताने अफगाण गृहयुद्धात नॉर्दन अलायन्सला पाठिंबा दिला आणि भारत २००१ नंतरच्या करझाई-गनी सरकारांचा घनिष्ठ भागीदार होता.

हे चित्र आता आमूलाग्र बदलले आहे. ऑक्टोबर २०२५ मध्ये तालिबानचे परराष्ट्रमंत्री अमीर खान मुत्तकी यांनी नवी दिल्लीला सहा दिवसांची ऐतिहासिक भेट दिली. कोणत्याही तालिबान नेत्याची भारताला पहिलीच अधिकृत भेट. परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांनी ऑगस्ट २०२१ पासून बंद असलेला काबूलमधील भारतीय दूतावास पुन्हा सुरू करण्याची घोषणा केली. तालिबानने नवी दिल्लीत दूत आणि मुंबईत वाणिज्य दूत नेमले. भारताने २०२६-२७ च्या अर्थसंकल्पात अफगाणिस्तानसाठी दीडशे कोटी रुपयांची तरतूद केली. दिल्ली, अमृतसर आणि काबूल यांच्यात मालवाहतूक विमानसेवा सुरू होत आहे, आणि पाकिस्तानला पूर्णपणे बगल देत इराणच्या चाबहार बंदरातून व्यापार विस्तारत आहे.

या निर्णयांमागे कुठलीही भावनिकता नाही. तो कणखर रणनीतिक वास्तववाद आहे. भारताच्या या निर्णयामागे अनेक कारणे आहेत. पहिले - अफगाणिस्तान पुन्हा भारतविरोधी दहशतवादाचे केंद्र बनू नये यासाठी तालिबानकडून मिळालेले आश्वासन. दुसरे-भूराजनीतिकदृष्ट्या अत्यंत महत्त्वाच्या या देशात चीन आणि पाकिस्तानच्या प्रभावाला प्रतिसंतुलन निर्माण करणे. तिसरे-अफगाणिस्तान आणि पाकिस्तान यांच्यातील तीव्र मतभेदांचा उपयोग करून अफगाणिस्तानातील पाकिस्तानच्या तथाकथित 'स्ट्रॅटेजिक डेप्थ'चा भ्रम संपुष्टात आणणे. गेल्या कित्येक दशकांपासून भारताविरुद्ध पाकिस्तानच्या छुप्या युद्धाला या भ्रमाने बळ दिले.

या धोरणाची परिणामकारकता पाकिस्तानच्या उन्मादपूर्ण प्रतिक्रियेवरून सिद्ध होते. खुद्द ख्वाजा आसिफ यांनी तालिबानवर अफगाणिस्तानला 'भारताची वसाहत' बनवल्याचा आरोप केला. पाकिस्तानचे लष्करी आणि गुप्तचर प्रस्थापित, ज्यांनी वर्षानुवर्षे कुठल्याही पुराव्यांविना टीटीपीला ह्यभारतीय हस्तक' ठरवले ते आता स्वतःच्याच निर्मितीच्या विडंबनाला तोंड देत आहेत.

पाक-अफगाण संकट एकाएकी उद्भवलेले नाही. ते पाकिस्तानच्या गेल्या दशकातील सर्वात वाईट सुरक्षा वातावरणाच्या, मे २०२५ मधील भारतासोबतच्या चार दिवसांच्या संघर्षानंतरच्या तणावपूर्ण पूर्व सीमेच्या, आणि मध्यपूर्वेतील इराणवरील युद्धामुळे बलुचिस्तानात अस्थिरता पसरण्याच्या भीतीच्या पार्श्वभूमीवर उद्भवले आहे. पाकिस्तानला आता तीन सीमांवर एकाचवेळी अस्थिरतेचा सामना करावा लागत आहे - पश्चिमेला अफगाणिस्तान, नैऋत्येला बलुचिस्तान, आणि पूर्वेला भारत.

पश्चिम सीमेवर अडकलेला पाकिस्तान पूर्व सीमेवर गडबड करण्यास धजावणार नाही, हे भारताचे गणित असणारच. परंतु त्यासही मयार्दा आहेत. जर पाकिस्तानच्या लष्करी आणि गुप्तचर यंत्रणांनी अफगाणिस्तानच्या कृतींमागे भारताचा हात असल्याचे मानले तर ते भारत आणि पाकिस्तान यांच्यातील धोकादायक तणावात भर पाडू शकतात. शिवाय, अमेरिकी आणि इस्रायली हवाई हल्ल्यांमुळे इराणच्या चाबहार बंदरातील व्यापारमार्ग विस्कळीत होण्याचा धोका आहे.

तुर्कस्तान, सौदी अरेबिया आणि कतार यांच्या पूर्वीच्या मध्यस्थीतून केवळ तात्पुरत्या युद्धबंदी झाल्या, ज्या आता विरून गेल्या आहेत. हे मध्यस्थ स्वतःच मध्यपूर्वेतील युद्धात गुरफटले आहेत. चीनने, चीन-पाकिस्तान आर्थिक मार्गिकेतील (सीपीईसी) गुंतवणूक आणि ऑगस्ट २०२५ मधील त्रिपक्षीय परराष्ट्रमंत्री बैठक असूनही, मर्यादित सहभागाचीच तयारी दाखवली. ट्रम्प प्रशासनाने - इराणमधील स्वतःच्या लष्करी कारवाईत गुंतले असताना - 'पाकिस्तान अतिशय छान काम करत आहे' असे सांगत हस्तक्षेप करणे नाकारले.

या परिस्थितीत नैतिक स्पष्टतेची आवश्यकता आहे. पाकिस्तानने जी जिहादी परिसंस्था निर्माण केली ती आता त्याला स्वतःलाच गिळंकृत करत आहे. पाकिस्तानने अफगाण तालिबानला हस्तक म्हणून पोसले, टीटीपीच्या पूर्वसुरींना शस्त्रास्त्रे दिली, आणि भारताशी छुप्या युद्धासाठी अफगाण भूमी बुद्धिबळपटासारखी वापरली. आता तालिबान पाकिस्तानच्या इच्छेप्रमाणे टीटीपीवर कारवाई करत नाही. पाकिस्तानच्या स्वतःच्या लबाड धोरणांचा हा बुमरँग आहे. एका अर्थाने पाकिस्तानच्या रणनीतिक दुःसाहसावर प्रत्याघात असलेल्या या दहशतवादासाठी अफगाण नागरिकांवर बॉम्ब टाकणे हे आत्मसंरक्षण नव्हे; तर क्रूरता आहे.

अफगाणिस्तानातील स्थिरता दक्षिण आशियाई शांततेच्या व्यापक हिताच्या दृष्टीने महत्त्वाची आहे. भारताने हा सहभाग आता अधिक दृढ करायला हवा. तालिबानच्या शासनपद्धतीचे समर्थन म्हणून नव्हे, तर पाकिस्तानच्या अस्थिरताकारक महत्त्वाकांक्षांना रणनीतिक प्रतिसंतुलन म्हणून हे पाऊल टाकायला हवे. अफगाणिस्तान यापुढे छुप्या युद्धांचे रणांगण न राहता प्रादेशिक संपर्कात भागीदार बनेल या दृष्टीने याकडे पाहायला हवे.



# झाकली मूठ...

शरद पवार दहाव्या वेळी संसदेवर जात आहेत. सहा वर्षांची राज्यसभेची ही मुदत संपेल तेव्हा ते साधारण एक्याण्णव वर्षांचे असतील. अविरत लोकसेवेची इतकी तीव्र इच्छा सातत्याने टिकवून ठेवणं हे कौतुकास्पदच म्हणायला हवे. शरद पवार यांना या वयात राज्यसभेवर जाण्याची इच्छा का, असा सवाल त्यांचे विरोधक व काही त्यांचे पूर्वसमर्थकही समाज माध्यमांवर करत आहेत. मात्र खरा प्रश्न असा आहे, की ज्या महाविकास आघाडीचे उमेदवार म्हणून शरद पवार राज्यसभेवर जाणार आहेत, त्या महाविकास आघाडीलाही शरद पवार यांच्याशिवाय दुसरा उमेदवार का मिळू नये? शरद पवार यांच्याऐवजी दुसरा उमेदवार या निवडणुकीच्या रिंगणात महाविकास आघाडीकडून उतरवला गेला असता, तर राज्यसभेच्या निवडणुकीत मतदान करताना पक्षाने नियुक्त केलेल्या प्राधिकृत प्रतिनिधीला दाखवून मत टाकावे लागत असले तरीही महाविकास आघाडीची मते फुटण्याची शक्यता त्यांच्या नेतृत्वाला वाटत होती का, असाही प्रश्न उपस्थित होतो. २०२२मध्ये झालेल्या राज्यसभा निवडणुकीत शिवसेनेचे अधिकृत उमेदवार संजय पवार यांची सहा मते फुटली होती. ही मते अपक्षांची होती, अशी लंगडी सबब महाविकास आघाडीच्या नेत्यांनी तेव्हा सांगितली होती. मात्र, राज्यातील सत्तेत नसतानाही भाजप काय करू शकतो, याची कल्पना खरे तर तेव्हाच उद्धव ठाकरे व शरद पवार यांना आली असावी. त्यामुळेच आज शरद पवार यांना राज्यसभेची उमेदवारी देऊन महाविकास आघाडीने एका अर्थी आपली लाज राखली असेच म्हणावे लागेल. खरे तर अजित पवार यांच्या अपघाती मृत्यूपश्चात शरद पवार व त्यांच्या पक्षातील सर्व महत्त्वाच्या नेत्यांनी अजित पवार यांच्या सोबत विलीनीकरणाची चर्चा सुरू होती व ते दादांचे स्वप्न पूर्ण व्हावे, असा सूर लावला होता.

# धक्कातंत्र की धक्क्यातून सावरण्याचा प्रयत्न



राज्यसभेची महाराष्ट्रातील निवडणूक अखेर बिनविरोध झाली. राज्यातील सात जागांसाठी महायुती आणि महाविकास आघाडीकडून संख्याबळानुसार उमेदवार देण्यात आले, महायुतीला खेळी करण्याची संधी असतानाही त्यांनी तसे काही केले नाही, त्याचा फायदा भाजपला सर्वाधिक झाला. जिथे त्यांचे तीन खासदार निवडून जाऊ शकत होते तिथे चार खासदार राज्यसभेत गेले आहेत. भाजपने धक्कातंत्राचा वापर केला की धक्क्यातून सावरण्याचा, हे येणारा काळ ठरवेल.

देशातील राज्यसभेच्या 37 पैकी सर्वाधिक 7 जागा या महाराष्ट्रातील आहेत, त्या खालोखाल तामिळनाडू सहा, बिहार आणि पश्चिम बंगालमधून प्रत्येकी पाच, ओडिशातून चार, त्यासोबतच तेलंगणा, आसाम, छत्तीसगड, हरियाणा आणि हिमाचल प्रदेश या दहा राज्यांतून राज्यसभेच्या एप्रिलमध्ये रिक्त होर्णाया जागांसाठी येत्या 16 मार्चला निवडणूक होणार आहे. महाराष्ट्रातील सातही उमेदवार बिनविरोध विजयी झाले आहेत. 85 वर्षांचे शरद पवार, 35 वर्षांचे पार्थ अजित पवार हे आजोबा आणि नातू एकत्र राज्यसभेत दिसणार आहेत. भाजपने रामदास आठवले यांना भाजपकडून तिकीट देऊन त्यांनाही आपल्यात सामावून घेतले. राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे हे मागील सात वर्षांपासून संसदीय राजकारणापासून दूर राहून पक्षासाठी काम करत होते, त्यांना कष्टाचे फळ अखेर मिळाले. विदर्भातील आदिवासी समाजाच्या माया ईवनाते या नागपूरच्या माजी महापौर आणि विद्यमान अग्निशमन सभापती, तर मराठवाड्यातील हिंगोलीचे धनगर समाजाचे रामराव वडकुते हे त्या अथार्ने बाहेरचे, राष्ट्रवादी काँग्रेसमधून 2019 मध्ये भाजपात आले. तिथे शेळी-मेंढी महामंडळाचे अध्यक्षपद आणि विधान परिषदेची संधी आघाडी सरकारने त्यांना दिली होती. मात्र सत्ताबदल होतोय कळल्यानंतर काठावर असलेले लवकर घरंगळत जातात, तसा वडकुतेंनी पक्षबदल केला. रामदास आठवले आणि विनोद तावडे यांच्या उमेदवारीपेक्षा माया ईवनाते आणि रामराव वडकुते यांच्या उमेदवारीची अधिक चर्चा आहे. या दोन्ही नेत्यांनी पक्ष, संघटनेसाठी काम केले आहेच, पण त्यांच्या कामासोबतच जातीय दुर्बिणीतून सापडलेले हे उमेदवार अधिक आहेत. याला सोशल इंजिनिअरिंग हा गोंडस शब्द दिला जात असला तरी संघ-भाजपच्या माधव आणि वनवासी फॉर्म्युल्यातून आलेले हे उमेदवार आहेत.

यंदा भाजपकडे विधानसभेतील सर्वाधिक जागा आहेत, त्यामुळे राज्यसभेच्या दोन जागांच्या बदल्यात आता चार जागांवर त्यांचा विजय निश्चित होता आणि तो बिनविरोध झालादेखील. त्यामुळेच इच्छुकांची संख्याही जास्त होती. मात्र भाजपने लोकसभेत विदर्भात सपाटून मार खाल्ला त्याची कारणं शोधून त्यावर उपाय म्हणून माया ईवनाते या आदिवासी समाजाच्या माजी महापौरांना संधी दिली. त्यामुळे भाजपचे हे धक्कातंत्र आहे की धक्क्यातून सावरण्याचा उपाय हे समजून घेणं गरजेचं आहे. लोकसभा 2024 निवडणुकीत विदर्भातून भाजपला मोठा धक्का बसला. विदर्भातील लोकसभेच्या दहा जागांपैकी नागपूर आणि अकोला या दोनच जागांवर विजय मिळाला. अकोल्यातील विजयदेखील तिरंगी लढतीतील मतविभाजनामुळे मिळालेला. काँग्रेसने येथेही भाजपला जेरीस आणले होते. 2019 मध्ये भाजपने 9 जागा जिंकल्या होत्या तर 2014 मध्ये दहा जागा जिंकल्या होत्या. तीन दशकं भाजपसोबत राहिलेला आदिवासी 2024 मध्ये भाजपपासून दूर गेला. अमरावती, यवतमाळ, चंद्रपूर, भंडारा-गोंदिया, गडचिरोली-चिमूर या आदिवासीबहुल मतदारसंघांमध्ये भाजपला जोरदार फटका बसला. भाजप आदिवासींच्या जल-जंगल-जमिनीच्या हक्कावर गदा आणत आहे, आरक्षणाचा अधिकारही गोठवला जात असल्याची आदिवासींना जाणीव झाल्याचा परिणाम लोकसभा निवडणुकीत दिसला होता. त्यामुळे तीन दशकांपासून भाजपसोबत असलेला आदिवासी समाज मागील निवडणुकीत संघ-भाजपपासून दुरावला. पुढील तीन साडेतीन वर्षांत होर्णाया लोकसभेचा विचार करून, पुन्हा धक्कादायक निकाल नको म्हणून भाजपने यंदा आदिवासी समाजाच्या माया ईवनाते यांना संधी दिली. लोकसभेच्या धक्क्यातून सावरण्यासाठीचा हा उपाय किती यशस्वी होतो ते 2029 मध्येच कळेल.

महाराष्ट्रात धनगर-हटकर समाज मोठ्या प्रमाणात आहे. मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्रात अनेक मतदारसंघात या समाजाची मते निर्णायक ठरतात. यातूनच चार दशकांपूर्वी वसंतराव भागवतांनी 'माधव फॉर्म्युला' 80च्या दशकात आणला होता. माळी, धनगर आणि वंजारी या ओबीसी समाजाला भाजपकडे आकृष्ट करण्यासाठी भागवतांनी सुरू केलेला हा प्रयोग चार दशकानंतरही भाजपने कालबाह्य ठरवलेला नाही, हे कालच्या निवडणुकीतून दिसून आले. महाराष्ट्रात ओबीसी समाज 40 टक्क्यांच्या आसपास असून तो 356 जातींमध्ये विभागलेला आहे. त्यामुळेच भाजप नेते प्रत्येक निवडणुकीत माधव फॉर्म्युल्याचा वापर करत आले आहे. रामराव वडकुते हे हिंगोली जिल्ह्यातील धनगर समाजातील नेते. हिंगोलीचे काँग्रेसचे दिवंगत नेते राजीव सातव यांच्या पत्नी प्रज्ञा सातव यांनी भाजपमध्ये प्रवेश केला आहे. त्यात आता वडकुते यांना भाजपने राज्यसभेचे बळ दिले, याचा किती परिणाम 2029च्या लोकसभेत होईल हे पाहावे लागेल. याआधी नागपूरचे डॉ. विकास महात्मे यांना धनगर मतांच्या राजकारणासाठी राज्यसभेची खासदारकी दिली होती. त्याचा किती परिणाम झाला हे 2024 च्या निवडणुकीत दिसलेच! दलित, मराठा, ओबीसी आणि आदिवासी अशी विविध जात समुहांची मोट बांधण्याचा भाजपचा प्रयत्न याही निवडणुकीत दिसला आहे. त्याचे परिणाम पाहण्यासाठी 2029 च्या लोकसभेची वाट पाहावी लागणार आहे.

एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेने या निवडणुकीत पक्षातील अनेक नेत्यांना धक्का दिला. पक्षाचे जनरल सेक्रेटरी आणि दक्षिण मध्य मुंबईचे माजी खासदार राहुल शेवाळे यांना राज्यसभेची संधी मिळणार असे निश्चित मानले जात असताना नाशिकचे माजी खासदार हेमंत गोडसेदेखील बाशिंग बांधून बसले. या दोन्ही माजी खासदारांची नाराजी स्वीकारत एकनाथ शिंदे यांनी उमेदवारी दाखल करण्याच्या काही क्षण आधी सोलापूरमधील पक्षाच्या कार्यकर्त्या प्रा. ज्योती वाघमारे यांना राज्यसभेत पाठवले आहे. आक्रमक भाषणशैली, मराठी, इंग्रजी भाषेवर प्रभुत्व आणि विरोधकांना सडेतोड उत्तर देण्याची तयारी असलेल्या नेत्या अशी बाजू ज्योती वाघमारेंची आहे. ठाकरेंच्या शिवसेनेच्या प्रवक्त्या सुषमा अंधारे यांच्या आक्रमक टीकेला प्रत्युत्तर देण्यासाठी वाघमारे परिचित होत्या, त्यांना थेट राज्यसभेची उमेदवारी देऊन आंबेडकरी समाजालाही जवळ करण्याचा प्रयत्न शिंदेंनी केला. त्यांच्या धक्कातंत्राने पक्षातील अनेकांना घायाळ केले आहे. आनंदराव अडसूळ, शायना एनसी यांना अजून वाट पाहावी लागणार आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये अजित पवारांच्या अपघाती निधनानंतर सुनेत्रा पवारांना त्यांची उपमुख्यमंत्रीपदाची रिक्त जागा देण्यात आली. त्या राज्यसभेतून राज्याच्या राजकारणात आल्या, त्यामुळे त्यांची रिक्त झालेली राज्यसभेची जागा पार्थ पवारांना जाणार हे तसे कौटुंबिक पक्षांच्या राजकारणाला साजेसेच झाले. यामुळे पवार कुटुंबातील पाच सदस्य आता विधानसभेपासून राज्यसभेपर्यंत सर्वत्र दिसणार आहेत. मावळ मतदारसंघात शरद पवारांनी पार्थ यांच्या उमेदवारीला विरोध केला होता. एकाच कुटुंबातील किती लोकांना तिकीट द्यायचे, असा त्यावेळी त्यांचा तर्क होता. आता 35 वर्षांचे पार्थ आणि 85 वर्षांचे शरद पवार राज्यसभेत एकत्रच असणार आहेत. आजोबा आणि नातू एकाचवेळी वरिष्ठ सभागृहात एकत्र असण्याची ही कदाचित पहिलीच वेळ असेल.

शरद पवार यांना राज्यसभेत पाठवण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस जेवढी आग्रही दिसली नाही, त्याहून अधिक आग्रह शिवसेनेचे (ठाकरे) राज्यसभा सदस्य संजय राऊत यांचा दिसला. महाविकास आघाडीला एकच जागा मिळणार होती, त्यासाठी तिन्ही पक्षांनी दावा केला. त्यातही ठाकरेंच्या शिवसेनेचे युवा आमदार आदित्य ठाकरे हे राज्यसभेची जागा शिवसेनेचीच असल्याचे लॉजिक मांडत राहिले. विधानसभेतील सर्वात मोठा पक्ष आमचा आहे. त्यामुळे पहिली संधी शिवसेनेला (ठाकरे) मिळाली पाहिजे, असा त्यांचा आग्रह होता. तर खासदार राऊत हे पवारांच्या ज्येष्ठतेचा आणि त्यांचे दिल्लीत असणे किती महत्त्वाचे आहे, हे ठासून सांगत होते. यातून शिवसेनेची (ठाकरे) दोन मते समोर आली. राऊतांनी आता पवारांना पाठिंबा देऊन 2028 मध्ये होणाऱ्या राज्यसभेच्या निवडणुकीसाठी आपली बुकिंग आताच करून ठेवली का, अशीही शंका आहे. आदित्य ठाकरेंनी हेही सांगितले की, काँग्रेसच्या भाजप आणि अदानीविरोधी आंदोलनात शिवसेना सहभागी आहे. आम्ही संसदेपासून रस्त्यापर्यंत त्यांचा विरोध करत आलो. त्यावेळी शरद पवारांची राष्ट्रवादी सभागृहातून वॉकआऊट करून सत्ताधाऱ्यांना पाठिंबा देत आली. शरद पवारांचा त्यांच्या ज्येष्ठतेचा आदर आहे, पण शिवसेनेचा (ठाकरे) दावा अधिक प्रबळ असल्याचे ते म्हणत राहिले. यामुळे शरद पवारांच्या उमेदवारीला शिवसेनेकडून खुल्या मनाने पाठिंबा मिळाल्याचे चित्र दिसून आले नाही. त्याचवेळी काँग्रेसने मात्र बैठकीत निर्णय होईल, असे सांगून दावाही सोडला नाही आणि आग्रही केला नाही. मात्र पक्षश्रेष्ठींकडून पवारांना पाठिंबा देण्याचा आदेश आल्यानंतर राज्यातील नेत्यांनी फारसे आढेवेढेही घेतले नाही. यातून काँग्रेसचा समंजसपणा दिसून आला.

# क्रॅटोमच्या पूरक औषधांनी आरोग्यावर दुष्परिणाम



**काही** वनौषधी कृत्रिम पूरकांच्या स्वरूपात घेतल्यास त्याचे आरोग्यावर वाईट परिणाम होतात, असे दिसून आले आहे. परदेशात जास्त वापरल्या जाणाऱ्या क्रॅटोम या वनौषधीच्या पूरकांमुळे आरोग्याची हानी होत असल्याचे पुरावे समोर आले आहेत. क्रॅटोम ही वनस्पती परदेशात लोकप्रिय असून तिचे वैज्ञानिक नाव मिट्रॅगना स्पेसिओसा आहे. ती कॉफी वर्गातील वनस्पती आहे. ऊर्जा वाढवणे व वेदना कमी करणे या दोन कारणास्तव आग्नेय आशियात मजूर लोक या वनस्पतीची पाने चावून खातात. क्रॅटोमचा वापर अमेरिकेत बेकायदेशीर मानला जात नाही. लोक ऑनलाइन त्याची खरेदी करतात. हिरव्या पावडरच्या स्वरूपात ही पूरक औषधी मिळते. क्रॅटोमचा अर्क सुरक्षित व नैसर्गिक मानला जातो. पण तो शरीरात गेल्यानंतर निष्क्रिय राहात नाही, असे संशोधकांचे मत असून अमेरिकेत त्याचा वापर अनेक वर्षे सुरू आहे. काही जण त्याचा वापर नैराश्यावर करतात, तर काहींना वेदना कमी करण्यास फायदा होतो. त्यात मिट्रॅग्नाइन हा ओपिऑइड पदार्थ असतो. या औषधीच्या वापरासाठी कुठलेही वैद्यकीय पुरावे नसले तरी त्याचा वापर अफूसारखा केला जातो. बुप्रेनोफाइनपेक्षा ही औषधी स्वस्त असते. न्यूयॉर्क विद्यापीठाचे विल्यम एगलस्टन यांनी याबाबत केलेल्या संशोधनानुसार याचे काही विषारी परिणाम हे ते औषध बंद केल्यानंतर दिसून येतात. 'जर्नल फार्माकोथेरपी' या नियतकालिकात हे संशोधन प्रसिद्ध झाले आहे. १ जानेवारी २०११ ते ३१ जुलै २०१८ दरम्यान लोकांनी या औषधाच्या केलेल्या वापराची माहिती घेऊन हे संशोधन करण्यात आले. त्यातून असे दिसून आले की, चिडचिडेपणा, गोंधळणे, वांत्या, भ्रम, कोमात जाणे, हृदयविकार असे परिणाम यातून होतात.

# आंब्याच्या पानांनी बनलेल्या चहाचे सेवन केल्याने गायब होतील आजार, जाणून घ्या याची रेसिपी

आंब्याला फळांचा राजा म्हटले जाते. आंबा खाण्यास जेवढा चविष्ट असतो, तेवढाच आरोग्यासाठीदेखील फायदेशीर असतो. एवढंच नव्हे तर आंब्याच्या पानांमध्ये देखील बरेच गुण असतात. या पानांमध्ये बरीच व्हिटॅमिन्स, मिनरल्स आणि अँटीऑक्सिडंट्स असतात. यात उपस्थित मंगिफेर्न नावाचा पदार्थ आरोग्यासाठी फारच फायदेशीर असतो. तुम्ही या पानांचा चहा बनवून त्याचे सेवन करू शकता. यामुळे पोटाशी निगडित बऱ्याच प्रकारचे आजार दूर होतात. आंब्याच्या पानांचा चहा तुमच्यासाठी फायदेशीर ठरू शकतो.



**आंब्याच्या पानांच्याचहाची रेसिपी :** हा चहा तयार करण्यासाठी आंब्याची पाने घ्या. ही पाने पाण्यात टाकून पाणी अर्धे होईस्तोवर उकळा. या पानांचा आपला वेगळा फ्लेव्हर असतो. म्हणून यात साखर मिसळायची गरज नसते. तुम्हाला हवे असेल तर यात आंबा किंवा पेरूचा रस मिसळू शकता. यानंतर या चहाला कपात गाळून घ्या आणि गरमागरम याचे सेवन करा.

**पोट ठेवेल निरोगी :** पोटाला निरोगी ठेवण्यासाठी तुम्ही आंब्याची पाने पाण्यात टाकून उकळा आणि य पाण्याला एखाद्या भांड्यात रात्रभर ठेवा. दुसऱ्या दिवशी सकाळी या पाण्याला गाळून उपाशीपोटी याचे सेवन करा. याचे नियमित सेवन केल्याने पोटाशी निगडित सर्व समस्या दूर होण्यास मदत मिळेल.

**व्हेरिकोज व्हेन्सची समस्या दूर होईल :** व्हेरिकोज व्हेन्सची समस्या दूर करण्यासाठी आंब्याच्या पानांना आधी पाण्यात उकळून याचा चहा तयार करून त्याचे सेवन करा. यात तुम्ही पेरू किंवा आंब्याचा रसदेखील घालू शकता.

**अस्थमाच्या रुग्णांसाठी फायदेशीर :** आंब्याच्या पानांना उकळून त्या पाण्यात मध मिसळून त्याचे सेवन केल्याने ब्रॉन्कायटिस आणि अस्थमाची समस्या दूर होण्यास मदत मिळते. हा चहा खोकल्याला प्रभावीपणे ठीक करतो.

**ब्लडप्रेशरसाठी फायदेशीर :** उच्च रक्तदाब असलेल्या रुग्णांसाठी देखील आंब्याच्या पानांचा चहा तसेच आंब्याची पाने टाकून उकळलेल्या पाण्याने अंघोळ करणे फायदेशीर असते.

**मधुमेह रोग्यांसाठी फायदेशीर :** आंब्याच्या पानांमध्ये एंथोसाइनिडिन नावाचे टॅनिन असते, जे सुरुवातीच्या मधुमेहाच्या उपचारात मदत करते. आंब्याच्या वाळलेल्या पानांची पूड करून काढा बनवून त्याचाही प्रयोग केला जातो, जो मधुमेह अँजियोपॅथी आणि मधुमेह रेटिनोपॅथीच्या उपचारात देखील मदत करतो.

# रोज एक टोमॅटो खाल्ल्याने होतात अनेक फायदे



सॅलडमध्ये तसेच भाज्यांमध्ये टोमॅटोचा वापर केला जातो. मात्र तुम्हाला माहीत आहेत का रोज टोमॅटो खाण्याचे फायदे. ज्या आजारांवरील इलाज कठीण आहे, त्यावरही टोमॅटो गुणकारी आहे.

- हृदयासंबंधित रोगांपासून बचाव होतो.
- युरिन इन्फेक्शनपासून बचाव तसेच रक्तशुद्धी होते.
- पचनशक्ती वाढते. पालकाच्या रसात टोमॅटोचा रस मिसळल्याने बद्धकोष्ठतेचा त्रास होत नाही.
- टोमॅटोमध्ये असलेल्या व्हिटॅमिन 'के'मुळे हाडे मजबूत होतात. तसेच बोन टिश्यू रिपेअर होण्यास मदत होते.
- अँटीऑक्सिडंटचे भरपूर प्रमाण असलेल्या टोमॅटोमध्ये व्हिटॅमिन 'सी' आणि 'ए' असते. व्हिटॅमिन 'ए' डोळ्यांसाठी तसेच डिहायड्रेशनसाठी चांगले.
- केसांना चमकदार तसेच मजबूत बनवण्यासाठीही टोमॅटो फायदेशीर आहे.
- त्वचेला उजाळा मिळवून देण्यासाठी टोमॅटो खाणे चांगले.
- बिया नसलेल्या टोमॅटोचा सॅलडमध्ये वापर केल्यास किडनी स्टोनची शक्यता कमी होते.
- प्रतिकारक्षमता वाढते. तसेच तणावापासून दूर रोखण्यासाठीही टोमॅटो लाभदायक आहे.
- स्मोकिंगमुळे शरीराला होणाऱ्या नुकसानापासून वाचण्यासाठीही टोमॅटोचे सेवन फायदेशीर ठरते.



# घरगुती क्रीम-साय

सकाळी अंघोळ केल्यावर क्रीम लावले नाही तर एक-दोन तासांतच परत त्वचा ओढली जाते आणि कोरडीही होते. बाजारातल्या नवनवीन येणाऱ्या क्रीमचा वापर तर नेहमीच केला जातो. पण नेहमीच घरात उपलब्ध असणारे क्रीम म्हणजेच साय कधीतरी वापरून पाहा.



- एक चमचा साय व लिंबाचा रस एकत्र करून रोज चेर्हयावर व ओठांवर लावल्यास ते फुटत नाही.
- थोडी साय व एक चमचा डाळीचे पीठ असे घरगुती उटणे साबणाला चांगला पर्याय आहे. त्यामुळे त्वचा मुलायम होते.
- मुलतानी माती बारीक करून सायीत मिसळून चेर्हयावर तसेच कोर्पयावर लावल्यास रंग उजळतो.
- तीन चार बदाम आणि दहा बारा देशी गुलाबाच्या पाकळ्या वाटून त्यात एक चमचा साय मिसळून ते मिश्रण चेर्हयावर लावल्यास चेर्हयावरच्या सुरकूत्या आणि काळे डाग नाहीसे होतात.
- सायीत समुद्र फेसची बारीक पावडर मिळवून लावल्यास चेर्हयावरची मुरमे बरी होतात.
- मोसंबी किंवा संत्र्याची सालं वाटून त्यात साय मिसळून त्याचा लेप लावल्यास त्वचा मुलायम व स्वच्छ होते.
- एक चमचा साय व एक चमचा सफरचंदाचा रस एकत्र करून फेटून हलक्या हाताने चेर्हयावर मालीश केल्यास चेर्हयाचा रंग उजळतो.
- थंडीच्या दिवसात खोकल्याचा त्रासही वाढतो. अशा वेळी अर्ध्या वाटी सायीत एक चमचा नारळाचा किस पाच मोठे वेलदोडे (पावडर) तसेच 10 मिरे भरडून बारीक गॅसवर परतून गरम करावे व झोपण्यापूर्वी गरमगरम खावे. थोडे दिवस असे केल्यास कोरडा खोकला बरा होतो.
- काशाच्या किंवा पितळी ताटलीत दोन चमचे ताजी साय थोडे पाणी घालून खूप फेटावे. साय हलकी होऊन लोण्यासारखी मऊ होईल. त्यात एक कापराची वडी बारीक करून मिसळावी. फोड, जखम यावर हे मलम लावल्यास फायदा होतो. हेच मलम लहान मुलांच्या टाळूवर घालून हलक्या हाताने मालीश केल्यास टाळू लवकर भरते व गरमीच्या दिवसात डोळ्याला थंडावा मिळतो.

# तुम्ही झोपताना केस बांधून झोपता की मोकळे सोडून?

तुमचे केस लांबलचक असतील तर दिवसभर त्यांची निगा राखण्यास भरपूर वेळ तुम्ही घालवत असाल... पण, रात्री झोपताना काय करायचं हा मात्र प्रश्न तुम्हाला अनेकदा पडत असेल.

**केस** मोकळे सोडले तर केसांचा गुंता होणार... आणि तो सोडवताना केस तुटणार... आणि बांधून ठेवले तर केसगळती वाढणार. असा अनुभव तुम्हालाही आला असेल. पण, यावर उपाय म्हणजे तुमचे केस कसे आहेत यावर झोपताना ते कसे बांधावेत हे अवलंबून आहे.

**केस स्ट्रेट असतील तर...**

तुमचे केस मोकळे आणि सरळ असतील तर रात्रीच्या वेळेस तुम्ही सैलसर पोनीटेल बांधून ठेवू शकता. म्हणजे ते सकाळी फ्रिझी होत नाहीत. सैलसर वेणी बांधून ठेवल्यास केसांमध्ये गुंता होणार नाही. तसेच त्यांना नॅचरल टॅग्स मिळतील. तुमचे केस लांब असतील ते बांधून ठेवणे सोयीस्कर ठरते. पण खूप वेळ आणि घट्ट बांधून ठेवू नका. यामुळे केस तुटण्याची शक्यता अधिक आहे.



**केस ओले असतील तर...**

केस ओले असताना ते मूळीच बांधून ठेवू नका. परंतु केसांमधील गुंतागुंत कमी करण्यासाठी तुम्हाला ते बांधून ठेवणे गरजेचे वाटत असेल तर ते सुकल्यानंतरच बांधा. यामुळे ते तुटण्यापासून बचावतील. हाच नियम ब्लो ड्रायसाठीदेखील लागू होतो. शक्य असेल तर नैसर्गिकरीत्याच सुकवण्याचा प्रयत्न करा.

**कुरळ्या केसांसाठी**

तुमचे केस कुरळे असतील तर डोक्यावर त्याचा आंबाडा बांधा किंवा एका बाजूला बांधून ठेवा. यामुळे तुमची झोपमोड होणार नाही याची काळजी घ्या. पण तो खूप घट्ट बांधू नका.

# कोको नानकटाई

**साहित्य :** १०० ग्रॅम मैदा, २० ग्रॅम कोको पावडर, १०० ग्रॅम पिठीसाखर, ७५ ग्रॅम पांढरे लोणी किंवा वनस्पती तूप, १/२ टीस्पून व्हॅनिला इसेन्स, १/४ टीस्पून बेकिंग पावडर.

**कृती :** पिठीसाखर-लोणी/तूप एकत्र करून हलके होईपर्यंत फेटून घ्या. मैद्यात बेकिंग पावडर, कोको पावडर टाकून चाळून घ्या. फेसलेल्या लोणीत चाळलेला मैदा व व्हॅनिला इसेन्स घाला. मिश्रणाचे लहान गोळे करा. ते दाबून जरा चपटे करून बेकिंग ट्रेमध्ये १ इंचाचे अंतर ठेवून मांडा. कन्व्हेक्शनवर मायक्रोवेव्ह प्रि-हीट करून १६० डिग्रीवर ५ मिनिटे बेक करा.



# स्ट्रेच मार्क लपवण्यासाठी मेकअपच्या 'या' टिप्स येतील कामी, जाणून घ्या अधिक



**बहुतांश** वेळेस महिलांना प्रेग्नन्सीनंतर शरीरावर स्ट्रेच मार्क येतात. त्यामुळे एखादा शॉर्ट कुर्ता किंवा टी-शर्ट घातल्यास शरीरावरील स्ट्रेच मार्क दिसून येतात. असे झाल्यास आपल्याला स्ट्रेच मार्कमुळे अवघडल्यासारखे वाटते.

यामुळे आपण काही वेळेस स्टायलिश कपडे घालण्याचा विचार करत नाही. स्ट्रेच मार्क हे त्वचेवर ताण पडल्यास निर्माण होतात. यामध्ये घाबरण्याची किंवा लाजण्याची काहीच गरज नाही. पार्टीसाठी तयार होण्यासाठी काही जण हेच स्ट्रेच मार्क लपवण्यासाठी विविध उपाय करतात. तर जाणून घ्या स्ट्रेच मार्क लपवण्यासाठी तुम्हाला मेकअपमधील काही सोप्या टिप्स कामी येतील.

स्ट्रेच मार्क लपवण्याची वेळ आल्यास रंगांची विसंगती काही वेळेस होते. त्यामुळे जर तुमची त्वचा तांबड्या रंगाची असेल तर त्याला हलक्या रंगाच्या मेकअपमधील पिवळ्या रंगाची शेड लावून लपवू शकता. तसेच अंगावरील स्ट्रेच मार्क खूप जुने असल्यास त्याबाबतसुद्धा काळजी करण्याचे काहीच कारण नाही. अशावेळी तुम्ही तुमच्या स्कीन टोनप्रमाणे रंग निवडून स्ट्रेच मार्क लपवू शकता.स्ट्रेच मार्क लपवल्यानंतर त्यावरील मेकअप कायम राहावा यासाठी मेअकप ब्रशने त्यावर सेटिंग पावडर लावणे विसरू नका. तसेच मेकअप शिवाय तुम्ही सेल्फ-टॅनरच्या मदतीने सहजतेने लपवू शकता. असे केल्यास तुम्हाला स्ट्रेच मार्क दिसत असल्याचीही जाणीव होणार नाही आणि तुम्ही मोकळेपणाने पार्टी एन्जॉय करू शकता.



# केस गळती रोखेल कडीपत्ता आणि जास्वंद तेल

**केसगळती ही जागतिक समस्या आहे. बरेच उपाय करूनही केसगळती काही कमी होत नाही. पण आपण कडीपत्ता आणि जास्वंदाच्या तेलाच्या वापर केल्यास केस गळतीपासून काहीसा आराम मिळू शकतो. यासाठी आपल्याला याचे तेल बनवावे लागणार आहे. चला तर मग हे तेल कसे बनवायचे आणि त्याचा वापर कसा करायचा हे जाणून घेऊ या.**



**साहित्य-** १०० ग्रॅम नारळाचे तेल, ३-४ चमचे एरंडेल तेल, ४ -५ जास्वंदाचे फुले, ३ मूठ कडीपत्ता, ३ चमचे तीळ, ३ चमचे मेथीदाणा, १ वाटी किसलेला कांदा, किसलेला आवळा आणि आले.

**कृती :** सर्वप्रथम नारळाच्या तेलात कडीपत्ता, जास्वंदाची फुले, तीळ, मेथीचे दाणे, किसलेला कांदा, किसलेला आवळा, आले घालून गॅसवर मंद आचेवर ठेवावे. गॅस मंदच असावा.

नाहीतर तेल जळू शकते. सर्व रसांचा अर्क नारळाचा तेलात उतरल्यावर गॅस बंद करून थंड होण्यासाठी ठेवावे. हे आयुर्वेदिक तेल आठवड्यातून दोनदा लावल्याने केसगळतीच्या त्रासापासून आराम मिळतो आणि केसगळती थांबते. गरज असल्यास एरंडेल तेलसुद्धा टाकावे. अजून चांगले परिणाम मिळतात.

# वाढत्या प्रदूषणामुळे आरोग्यावर परिणाम जाणून घ्या प्रतिबंधात्मक उपाय

**वाढते** प्रदूषण हा जगभरातील मोठा धोका आहे. प्रदूषणामुळे लोक अनेक गंभीर आजारांना बळी पडत आहेत. वाढत्या वायू प्रदूषणामुळे फुफ्फुसाचे आजार, दमा, धाप लागणे, डोळे जळणे, घशातील संसर्ग, क्षयरोग असे गंभीर आजार होत आहेत. वाढत्या प्रदूषणाचा धोका लक्षात घेऊन जागतिक स्तरावर अनेक संस्था त्यावर उपाययोजना करत आहेत. पण एवढेच नाही तर प्रदूषणामुळे तुम्हाला शरीराशी संबंधित गंभीर आजार तर होतातच पण त्यामुळे तुमच्या मानसिक आरोग्यावरही वाईट परिणाम होत आहेत. ब्रिटिश मेडिकल जर्नलमध्ये प्रसिद्ध झालेल्या अहवालानुसार, जगभरातील प्रदूषणामुळे १८ ते २५ वयोगटातील तरुणांना अनेक मानसिक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. हवामान बदल, ग्लोबल वॉर्मिंग आणि अनेक गंभीर आजारांशिवाय प्रदूषणाचा लोकांच्या मानसिक आरोग्यावर वाईट परिणाम होत आहे. वाढत्या प्रदूषणामुळे तरुणांना पर्यावरण चिंतेची समस्या भेडसावत आहे. प्रतिध्वनी चिंताची कारणे, लक्षणे आणि प्रतिबंधात्मक उपायांबद्दल तपशीलवार जाणून घेऊया.

**इको चिंता म्हणजे काय?**

वाढत्या प्रदूषणामुळे शरीराला गंभीर आजार तर होत आहेतच, पण त्याचबरोबर ते मानसिक समस्यांनाही कारणीभूत ठरत आहे. वातावरणातील बदल, ग्लोबल वार्मिंग आणि वायू प्रदूषणाची वाढती पातळी यामुळे लोकांच्या मानसिक आरोग्यावर वाईट परिणाम होत आहे. अमेरिकन सायकियाट्रिक असोसिएशन (एपीए) च्या मते, पर्यावरण-चिंता ही अशी स्थिती आहे जी वाढत्या प्रदूषणामुळे आणि हवामानातील बदलांमुळे लोकांमध्ये चिंतेचे कारण बनते. त्यामुळे लोकांमध्ये अनिश्चित भीतीचे वातावरण निर्माण होऊन मानसिक आरोग्यावर परिणाम होत आहे. चिंतेमुळे लोकांच्या कामावरही परिणाम होत असून त्यामुळे शारीरिक आरोग्यावरही परिणाम होत आहे. काही काळापूर्वी मानसशास्त्रज्ञांनी इको अँन्झायटी दिली आहे आणि जगभर त्याविषयी बरीच चर्चा होत आहे. इको चिंतामुळे तुम्हाला आघात, तणाव, चिंता, नैराश्य आणि भीतीची भावना मुख्यतः १८ ते २५ वर्षे वयोगटातील लोकांमध्ये येत आहे.

**इको एंग्जायटीची कारणे**

पर्यावरणाच्या समस्या, वाढत्या प्रदूषणामुळे शरीरावर आणि आरोग्यावर होणारे परिणाम या चिंतेमुळे लोक पर्यावरणाच्या चिंतेचे बळी ठरत आहेत. यापैकी सर्वात जास्त प्रभावित लोक १८ ते २५ वयोगटातील तरुण आहेत. याशिवाय, ब्रिटिश मेडिकल जर्नलमध्ये प्रकाशित झालेल्या संशोधनानुसार, पर्यावरणातील बदल, ग्लोबल वॉर्मिंग आणि पर्यावरणीय संकटे, भविष्यात नोकऱ्या आणि इतर संकटांमुळे लोकांमध्ये पर्यावरणाची चिंता वेगाने पसरते यामुळे लोकांच्या काळजीचे एक कारण म्हणजे ते थांबवण्यासाठी काही करत नाहीत असा लोकांचा समज आहे.

**पर्यावरण चिंता लक्षणे**

वाढत्या प्रदूषणामुळे आणि पर्यावरणाशी संबंधित बदलांमुळे मानवावर अनेक परिणाम होत आहेत. याचा एक मोठा परिणाम म्हणजे यामुळे लोकांमध्ये पर्यावरणाच्या चिंतेची समस्या निर्माण होत आहे. इको चिंतेमुळे लोकांमध्ये दिसणारी लक्षणे खालीलप्रमाणे आहेत.

**जास्त काळजी**

■ भीती आणि अनिश्चित भीतीची भावना ■ कनिष्ठतेची भावना ■ झोप समस्या ■ भूक मध्ये बदल ■ लक्ष केंद्रित करू शकत नाही

**इको एंग्जायटीपासून वाचण्याचे उपाय**

इको चिंता टाळण्यासाठी, आपण प्रथम आपला आहार आणि आरोग्याकडे लक्ष दिले पाहिजे. याशिवाय, जर तुम्ही तुमच्या दिनचर्येतून थोडा वेळ काढू शकत असाल, तर तुम्ही पर्यावरणाशी संबंधित काही कामात स्वतःला झोकून दिले पाहिजे. याशिवाय तणाव किंवा चिंता यासारख्या मानसिक समस्या टाळण्यासाठी या गोष्टी लक्षात ठेवा.



■ मद्यपान आणि धूम्रपानापासून दूर राहावे. ■ कॉफी आणि कॅफिनयुक्त पदार्थांचे सेवन कमी करा. ■ उद्या किंवा भविष्याबद्दल जास्त काळजी करू नका. ■ नकारात्मक परिस्थिती आणि नकारात्मक विचारांपासून दूर राहा. ■ सकस आणि संतुलित आहार घ्या. ■ नियमित व्यायाम करा.

# इंटरनेटविना होईल ऑनलाइन पेमेंट! जाणून घ्या कशाप्रकारे वापरता येईल गुगल वॉलेट

भारतात ५जी इंटरनेट कनेक्टिव्हिटी काही ठिकाणी कमी आहे. त्यापासून वाचण्यासाठी गुगलने वॉलेटमध्ये व्हर्च्युअल कार्ड जोडून एक नवीन पेमेंट सिस्टम सुरू केली आहे. या पेमेंट सिस्टममध्ये गुगल वॉलेटवरून इंटरनेटविना देखील पेमेंट करता येईल.

**भारतात** सध्या ५जी इंटरनेट कनेक्टिव्हिटी सादर करण्यात आली आहे, परंतु तरीही काही ठिकाणी आजही इंटरनेट कनेक्टिव्हिटी उपलब्ध नाही. त्यामुळे गुगलची एक नवीन टेक्नॉलॉजी खूप उपयुक्त ठरू शकते. ज्यात इंटरनेटविना ऑनलाइन पेमेंट करता येईल. गुगलनं कॉण्टॅक्टलेस पेमेंट सिस्टम सादर केली आहे. यात गगुल वॉलेट व्हर्च्युअल कार्ड पेमेंटशी जोडले जाईल. या टेक्नॉलॉजीमध्ये गुगलला एकदा इंटरनेट कनेक्शन असताना कार्ड कनेक्ट करावा लागेल. त्यानंतर इंटरनेटविना पेमेंट करता येईल. कार्ड कनेक्ट झाल्यावर तुम्ही सिम्पल टॅप करून पेमेंट करू शकता.

**कशी वापरायची नवीन पेमेंट सिस्टम**

कॉण्टॅक्टलेस पेमेंटमध्ये कार्ड आणि कार्डविना फोन किंवा स्मार्टवॉचने पेमेंट करता येईल. जेव्हा तुम्ही गुगल वॉलेट ओपन करता तेव्हा एक डिफॉल्ट व्हर्च्युअल कार्ड दिसते. त्या पॉइंटवर फोन कार्ड डेटा रीडरपर्यंत पोहोचतो. जेव्हा तुमचा अँड्रॉइड फोन एनएफसी सिग्नल रीडरकडे पोहोचतो तेव्हा पेमेंट होतं.

तसेच जेव्हा तुम्ही ऑफलाइन असता तेव्हा तुमचा फोन कोणत्याही समस्येविना गुगल वॉलेटच्या एनएफसी-संचारित कोडचा वापर करून पेमेंट करतो. परंतु जर तुम्ही बराच काळ ऑफलाइन राहिलात तर पेमेंट नीट होत नाहीत.

**नोट :** ऑफलाइन पेमेंटसाठी गुगलला दर दोन दिवसांनी कमीत कमी एकदा इंटरनेटशी कनेक्ट व्हावं लागेल. ज्यामुळे तुम्ही बिनदिक्कत गुगल वॉलेटवरून ऑफलाइन पेमेंट करू शकाल.




**यूपीआय लाइटदेखील येईल वापरता**

रिझर्व्ह बँकेने गेल्या आठवड्यात यूपीआय लाइट लॉँच केले. यूपीआय लाईट हे नियमित यूपीआयपेक्षा थोडे वेगळे आहे. हे एक 'ऑन-डिव्हाइस वॉलेट' वैशिष्ट्य आहे, जे वापरकर्त्यांना यूपीआय पिन न वापरता रिअल टाइममध्ये लहान रक्कम पेमेंट करण्याचा पर्याय उपलब्ध करून देते. यूपीआय लाइट लहान रकमेच्या व्यवहारांसाठी तयार केले आहे. त्यामुळे याद्वारे व्यवहाराची सर्वाधिक मर्यादा ५०० रुपये आहे. एनपीसीआय वेबसाइटनुसार यूपीआय लाइटद्वारे ५०० रुपयांपेक्षा कमी पेमेंटसाठी वापरकर्त्यांना यूपीआय पिनची गरज पडणार नाही. याशिवाय एनपीसीआयने म्हटले की, सुरुवातीला यूपीआय लाइट ऑफलाइन काम करेल.

# वसई-विरारमध्ये वीज चोरीचे प्रकार वाढले... वर्षभरात 577 प्रकरणे उघड

**■मुंबई। प्रतिनिधी,**

वसई-विरार परिसरात बेक्कीदेशीररित्या वीज वापरण्याचे प्रकार अजूनही थांबलेले नसल्याचे दिसून येत आहे. महावितरणच्या तपासणी मोहिमेत चालू आर्थिक वर्षात 577 वीज चोरीची प्रकरणे उघडकीस आली असून सुमारे साडेदहा लाख युनिट वीज चोरी झाल्याचे आढळले आहे. महावितरणच्या वसई मंडळामार्फत वसई, विरार आणि वाडा या भागांना वीजपुरवठा केला जातो. या परिसरात घरगुती, व्यावसायिक, औद्योगिक तसेच शासकीय मिळून सुमारे 10 लाख 70 हजार ग्राहक आहेत. मोठ्या प्रमाणात वीज वापर असलेल्या या भागात काही ठिकाणी विविध मार्गांनी वीज चोरी होत असल्याचे तपासणीतून समोर आले आहे.



**स्मार्ट मीटरमुळे देखरेख सोपी**
वीज चोरी रोखण्यासाठी स्मार्ट मीटर प्रणाली उपयुक्त ठरत असल्याचे महावितरणने सांगितले आहे. स्मार्ट मीटरमध्ये फेरफार करण्याचा किंवा चुंबक लावण्याचा प्रयत्न झाला तर त्याची माहिती थेट सिस्टीममध्ये मिळते. तसेच विद्युत प्रवाहातील बदल किंवा असमतोलही ऑनलाइन पद्धतीने दिसून येतो. त्यामुळे संशयास्पद प्रकरणांवर त्वरित कारवाई करता येते असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले

मीटरमध्ये छेडछाड करणे,मीटरच्या रीडिंगमध्ये बदल करणे किंवा मुख्य वीजजोडणीच्या वायरला थेट जोड देऊन वीज वापरणे अशा पद्धतीने चोरी केली जात असल्याचे महावितरणने स्पष्ट केले आहे. अशा प्रकारांमुळे महावितरणला मोठा आर्थिक फटका बसत असून प्रामाणिकपणे बिल भरणाऱ्या ग्राहकांवरही त्याचा परिणाम होत असल्याचे सांगितले जात आहे.

वीज चोरी रोखण्यासाठी महावितरणकडून विशेष पथके आणि भरारी पथके नियुक्त करण्यात आली आहेत. या पथकांकडून शहरातील विविध भागांत अचानक तपासणी केली जात आहे. या कारवाईदरम्यान चालू आर्थिक वर्षात 577 वीज चोरी प्रकरणे उघडकीस आली आहेत. तपासणीत सुमारे 10 लाख 59 हजार 24 युनिट इतकी वीज चोरी झाल्याचे आढळले असून त्याची किंमत सुमारे ८0 लाख रुपयांची वसुली करण्यात आली आहे. तसेच या प्रकरणात विविध पोलिस ठाण्यात आठ गुन्हे दाखल करण्यात आल्याची माहिती महावितरणकडून देण्यात आली.

"वीज चोरीमुळे महावितरणला आर्थिक तोटा सहन करावा लागतो. त्यामुळे असे प्रकार टाळण्यासाठी शहरात सातत्याने तपासणी मोहीमा राबवल्या जात आहेत. तसेच सदोष मीटर बदलण्याचे कामही हाती घेण्यात आले आहे."
– संजय खंडारे, अधीक्षक अभियंता, महावितरण विभाग, वसई

# ठाणेकरांसाठी महत्त्वाची बातमी!
## कल्याण-शिळ रोडवर वाहतूक महिनाभर बंद...




**■ठाणे। प्रतिनिधी,**

ठाणे वाहतूक पोलिसांनी ठाणे आणि कल्याणमधील नागरिकांना आवाहन केलंय की, कल्याण-शिळ रोडवर वाहतूक महिनाभर बंद राहणार आहे. कल्याण-शिळ मार्गावरील मेट्रो-12 प्रकल्पाच्या कामामुळे परिसरात वाहतुकीबद्दल मोठा बदल करण्यात आला आहे. वाहतूक कोंडी टाळण्यासाठी काही मार्गावर टप्प्याटप्प्याने वाहतूक नियंत्रण लागू करण्यात येणार आहे. कल्याण-शिळ मार्गावर काही ठिकाणी रात्रीच्या वेळी वाहतूक बंद राहणार आहे. मेट्रो प्रकल्पासाठी मोठे सिमेंट गर्डर बसवण्याचे काम सुरू असल्यामुळे ही बंदी 6 मार्च ते 31 मार्च 2026 दरम्यान दररोज रात्री 11.55 ते पहाटे 5 या वेळेत असणार आहे.

ठाणे वाहतूक विभागाने माहिती दिली आहे की, मानपाडा सर्कल ते टाटा नाका दरम्यान मेट्रोचे गर्डर बसवण्यासाठी जड गॅन्ट्री यंत्रांचा वापर करण्यात येत आहे. त्यामुळे नागरिकांची आणि कामगारांची सुरक्षणासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. दरम्यान, ठाणे वाहतूक पोलिसांनी रात्री उशिरा प्रवास करणाऱ्या वाहनचालकांनी या नियमांचे पालन करण्याचे आवाहन केलं आहे. तसंच शक्य असल्यास पयार्यी मार्गाचा वापर करावा, असंही आवाहन करण्यात आलंय.

**टप्प्याटप्प्याने वाहतुकीत बदल**

- टप्पा 1 - 6 मार्च ते 10 मार्च या कालावधीत दररोज रात्री 11.55 ते पहाटे 5 वाजेपर्यंत कल्याण ह्न शिळ रोडवरून शिळफाटा ते कल्याणकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना सोनारपाडा पिलर क्रमांक 180 येथे प्रवेशबंदी करण्यात येणार आहे, या काळात संबंधित वाहने सोनारपाडा पिलर परिसरातून डावीकडे वळून सर्विस रोडमार्गे पुढे जाऊन डी. एन. एस. चौक मार्गे आपल्या इच्छित स्थळी पोहोचू शकतील.
- टप्पा 2 - 11 मार्च ते 18 मार्च या कालावधीत त्याच वेळेत विक्रमानगर पिलर क्रमांक 105 येथे वाहतूक रोखण्यात येणार आहे. या कालावधीत वाहनचालकांनी विक्रमानगर परिसरातून सर्विस रोडचा वापर करून पुढील मार्गक्रमण करावे.
- टप्पा 3 - 19 मार्च ते 25 मार्चदरम्यान मानपाडा चौक पिलर क्रमांक 200 परिसरात वाहतुकीवर निबंध लागू राहतील. या काळातही वाहनांना पयार्यी मार्गाने वळवण्यात येणार आहे.
- टप्पा 4 - 26 मार्च ते 31 मार्चदरम्यान सोनारपाडा पिलर क्रमांक 146 येथे रात्रीच्या वेळेत प्रवेशबंदी लागू राहणार आहे. या काळात वाहनचालकांना सर्विस रोडचा वापर करून डी. एन. एस. चौकमार्गे पुढे जाण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.

# अंबरनाथमध्ये केमिकल कंपनीत भीषण आग



**■ठाणे। प्रतिनिधी,**

ठाणे जिल्ह्यातील डोंबिवली एमआयडीसीतील कंपन्यांमध्ये होणाऱ्या स्फोटावरुन सातत्याने येथील सुरक्षेचा आढावा घेतला जातो. परंतु, पुन्हा त्याची पुनरावृत्ती होतानाचे पाहायला मिळत आहे. अंबरनाथमधील आनंदनगर एमआयडीसीमध्ये आज केमिकल कंपनीत भीषण स्फोट झाल्याची घटना घडली. या स्फोटानंतर आगीचा भडका आणि धुराचे मोठ-मोठे लोट पसरल्याचंही दिसून आलं. स्फोटानंतर कंपनीतील केमिकल रस्त्यावर आल्याने रस्त्यावर देखील आगीचा भडका पाहायला मिळाला, धुराचेही लोटही दूरवर पसरले होते. स्फोट होताच कंपन्यांमधील कामगारांनी हातातील काम थांबवत जिवाच्या आकांताने धाव घेतली. कामगार रस्त्यावर सैरावैरा धावताना दिसून आले. दरम्यान, आगीचे वृत्त समजताच घटनास्थळी अग्निशमन दलाच्या गाड्या दाखल झाल्या आहेत. मात्र, केमिकल कंपनीतील आगीने रौद्ररूप धारण केल्याने आग आटोक्यात आणण्यात अडथळे येत आहेत. कंपनीत आगीमुळे मोठमोठे स्फोट होत असल्याने कामगारांची धावपळ पाहायला मिळत असून, कंपनीतील विविध केमिकलमुळे विविध ठिकाणी स्फोट होत आहेत. एमआयडीसीमधील गणेश केमिकल नावाच्या कंपनीला ही आग लागली आहे. आगीचा भडका इतक्या मोठ्या प्रमाणात उडाला की, शेजारी असलेल्या मिरॅकल केबल आणि क्लाउड नाईन या कंपन्यांनादेखील आग लागली असल्याची प्राथमिक माहिती आहे.

# महाराष्ट्रातील २३ हजारांहून अधिक जलक्षेत्रांचे अस्तित्व धोक्यात
## उरणमधील पूरस्थिती ठरतेय धोक्याचा इशारा

**■उरण। प्रतिनिधी,**

केंद्र सरकारच्या नॅशनल सेंटर फॉर सस्टेनेबल कोस्टल मॅनेजमेंट (एनसीएससीएम) या संस्थेने प्रत्यक्ष जमिनीवर जाऊन (ग्राऊंड दुथिंग) सर्वेक्षण पूर्ण केले असतानाही महाराष्ट्रातील २३ हजारांहून अधिक जलक्षेत्रांना अद्याप कायदेशीर संरक्षण मिळालेले नाही. माहिती अधिकारातून उघड झालेल्या या धक्कादायक माहितीमुळे पर्यावरणप्रेमींमध्ये संताप व्यक्त केला जात आहे. सुमारे २० वर्षापूर्वी इस्रोच्या स्पेस ॲप्लिकेशन्स सेंटरने उपग्रह चित्रांच्या आधारे 'नॅशनल वेटलँड ॲटलस' तयार केला होता.

**नैसर्गिक जलसंपत्ती कागदावरच उरण्याची भीती**
ठाणे : १,८९५, रायगड : १,७६०, मुंबई उपनगर : ४१२, मुंबई शहर : ६३, पुणे, नाशिक, अहमदनगर दरम्यान, सर्वोच्च न्यायालयाने २.२५ हेक्टरपेक्षा मोठ्या सर्व जलक्षेत्रांचे संरक्षण करण्याचे निर्देश दिले असले तरी प्रत्यक्ष अंमलबजावणी अत्यंत संथ आहे. अधिसूचना प्रक्रिया तातडीने पूर्ण झाली नाही, तर महाराष्ट्रातील ही नैसर्गिक जलसंपत्ती केवळ कागदावरच उरेल, अशी भीती पर्यावरण तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे.



त्यानंतर गेल्या दोन वर्षात एनसीएससीएमने राज्यातील जलक्षेत्रांचे सविस्तर दस्तावेजीकरण पूर्ण केले. मात्र, ही वैज्ञानिक माहिती उपलब्ध असूनही राज्य सरकारकडून या जलक्षेत्रांना अधिकृतरीत्या 'अधिसूचित' करण्यात आलेले नाही. विशेष म्हणजे महाराष्ट्रात अद्याप एकाही जलक्षेत्राला अधिकृत संरक्षण मिळालेले नसल्याचे समोर आले आहे.

वैज्ञानिक पुरावे उपलब्ध असतानाही केवळ राजकीय इच्छाशक्तीच्या अभावामुळे ही प्रक्रिया लांबणीवर पडत आहे, असा आरोप नॅटकनेक्ट फाऊंडेशनचे संचालक बी. एन. कुमार यांनी केला आहे, तर सागरशक्तीचे संचालक नंदकुमार पवार यांनी इशारा दिला की, जिल्हाधिकारी कार्यालय, सिडको आणि नगरविकास विभाग १:४,००० प्रमाणातील वैधानिक नकाशे तयार करण्याबाबत गंभीर नाहीत. त्यामुळे जलक्षेत्रांवर माती टाकून बेकायदेशीर जमीन बळकावण्याचे प्रकार वाढत आहेत.

राज्याच्या पर्यावरण व हवामान बदल विभागाने दिलेल्या माहितीनुसार, एनसीएससीएमचा अहवाल पुढील पडताळणीसाठी जिल्हा प्रशासनाकडे पाठवण्यात येणार आहे. जिल्हाधिकारी स्तरावर तपासणी झाल्यानंतर नागरिकांच्या हरकती व सूचना मागविल्या जातील. मात्र, ही लांबत जाणारी प्रक्रिया म्हणजे जलक्षेत्रे नष्ट होण्याला दिलेली मूक संमती असल्याची टीका पर्यावरणवाद्यांनी केली आहे.

**शासकीय तिजोरीवर भार**

जलक्षेत्रांचा ऱ्हास झाल्यामुळे उरण परिसरात अभूतपूर्व पूरस्थिती निर्माण झाल्याचे दिसून आले आहे. महसूल विभागाच्या माहितीनुसार, गेल्या दोन दशकांत कधीही पाणी न भरलेल्या भागात पूर आल्याने सरकारला पूरग्रस्तांना सुमारे ४ कोटी रुपयांची भरपाई द्यावी लागली आहे.

# मत्स्य व्यवसाय विभागात डिजिटल क्रांती : मंत्री नितेश राणे

**■मुंबई। प्रतिनिधी,**

आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देऊन मत्स्य व्यवसाय विभागात डिजिटल क्रांती घडवण्याचा निर्णय मत्स्यव्यवसाय आणि बंदरे मंत्री नितेश राणे यांनी घेतला आहे. त्यानुसार, आता या विभागात कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाचा वापर आणखी वाढवला जाणार असून, त्याद्वारे मासेमारीचा डेटा आणि माहिती संकलित करून व्यवसायाला नवी दिशा दिली जाणार आहे.



या संदर्भात सोमवारी मंत्रालयात आयोजित विशेष बैठकीत 'मार्वल' कंपनीकडून प्रगत प्रणालीचे सादरीकरण करण्यात आले. राज्यातील मासेमारी क्षेत्रातील अचूक माहिती संकलित करणे, डेटाचे विश्लेषण करणे आणि त्याचा प्रभावी वापर करून मच्छिमारांना अधिक सक्षम करणे, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. यावेळी पदुमचे सचिव एन. रामास्वामी, मत्स्यव्यवसाय सहआयुक्त ऋता दीक्षित, मार्वल कंपनीचे संचालक साईकृष्णा बुडमगंटा आणि सिंधुदुर्गच्या जिल्हाधिकारी तृप्ती धोडमिसे (ऑनलाईन) यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

मत्स्य व्यवसायासोबतच सिंधुदुर्ग जिल्ह्यातील दळणवळण सुविधांच्या आधुनिकीकरणावरही बैठकीत भर देण्यात आला. जिल्ह्यातील कणकवली आणि तळेरे या महत्त्वाच्या बसस्थानकांचा सार्वजनिक-खाजगी भागीदारी तत्त्वावर विकास केला जाणार आहे. या प्रस्तावाबाबत पालकमंत्री नितेश राणे यांच्या अध्यक्षतेखाली विस्तृत चर्चा झाली.

नव्या आराखड्यानुसार, ही बसस्थानके आधुनिक सुविधांनी सज्ज असतील. प्रवाशांसाठी अद्ययावत सोयी, परिसराचे सुयोग्य नियोजन आणि व्यावसायिक संधी लक्षात घेऊन ही उभारणी केली जाणार आहे. एसटी महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक माधव कुसेकर, बांधकाम विभागाचे महाव्यवस्थापक दिनेश महाजन व अन्य अभियांत्रिकी अधिकाऱ्यांनी या प्रकल्पाच्या अंमलबजावणीबाबत तांत्रिक बाजू मांडल्या. या निर्णयामुळे कोकणातील प्रवाशांना आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सोयीसुविधा मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

# 18 नाही तर सोळावं वरीस ड्रायव्हिंग लायसन्सचं... कसं मिळवायचं जाणून घ्या

**■ठाणे। प्रतिनिधी,**

बहुतेकांना वाटते की लायसन्स फक्त 18 वर्षानंतरच मिळते. पण केंद्रीय मोटर वाहन कायद्यानुसार, 16 वर्षाच्या वयात 'मोटरसायकल विदाउट गियर' (एमसीडब्ल्यूओजी) श्रेणीचे लायसन्स मिळू शकते. हे फक्त गियरलेस दुचाकींसाठी असते. जसे स्कूटर किंवा कमी क्षमतेच्या इलेक्ट्रिक बाइक्ससाठी असते. सरकारने हे नियम किशोरवयीन अपघात रोखण्यासाठी आणि सुरक्षित शिकवण्यासाठी आणले आहेत. हे सर्व राज्यांमध्ये लागू आहे. याबद्दल सविस्तर जाणून घेऊया.




**मर्यादा काय आहेत?**
हे लायसन्स फक्त 50 सीसी पर्यंतच्या गियरलेस दुचाकींसाठी आहे. गियर बाइक किंवा कार चालवता येत नाही. लर्नर्स लायसन्ससह प्रौढ व्यक्तीच्या देखरेखीखालीच वाहन चालवा. नियम मोडल्यास लायसन्स रद्द होऊ शकते आणि दंड होतो, हे माहिती असूद्या.

**पात्रता निकष काय?**

अर्जदाराचे वय किमान 16 वर्षे असावे. 18 वर्षाखालील मुलांना आई-वडील किंवा कायदेशीर पालकांची लेखी परवानगी आवश्यक आहे. हे लायसन्स फक्त एमसीडब्ल्यूओजी श्रेणीसाठी आहे. कार, गियर असलेली बाइक किंवा हलकी वाहने चालवण्यासाठी हे वैध नाही. पात्रता तपासण्यासाठी आरटीओ किंवा ऑनलाइन पोर्टलवर माहिती घ्या.

**अर्ज प्रक्रिया कशी?**

अर्जदारांना अर्ज ऑनलाइन किंवा ऑफलाइन करता येतो. सरकारच्या परिवहन किंवा सारथी वेबसाइटवर जाऊन फॉर्म भरा. वैयक्तिक तपशील, वय आणि पत्ता टाका. कागदपत्रे अपलोड करा आणि शुल्क भरा. स्थानिक आरटीओ कार्यालयातही अर्ज करता येतो. प्रक्रिया सोपी असून, काही दिवसांत लर्नर्स लायसन्स मिळते.

**आवश्यक कागदपत्रे कोणती?**

वयाचा पुरावा (जन्म प्रमाणपत्र किंवा शाळेचे प्रमाणपत्र), पत्त्याचा पुरावा (आधार कार्ड) आणि पालकांची लेखी संमती द्या. हे कागदपत्रे स्कॅन करून अपलोड करा. शुल्क साधारण 150 ते 200 रुपये आहे. योग्य कागदपत्रे असल्यास प्रक्रिया वेगवान होते, याची नोंद घ्या.

**चाचणी कशी होते?**

लर्नर्स लायसन्ससाठी ट्रॅफिक नियम आणि रस्ता सुरक्षेबाबत ऑनलाइन चाचणी द्या. यात 15-20 प्रश्न असतात आणि 60% गुण हवेत. अभ्यासासाठी वेबसाइटवर साहित्य आहे. पास झाल्यास लर्नर्स लायसन्स मिळते, जे 6 महिने वैध असते. नंतर कायम लायसन्ससाठी ड्रायव्हिंग टेस्ट द्यावी लागेल.

**दंड किती?**

विना लायसन्स ड्रायव्हिंग हा गंभीर गुन्हा आहे. किशोर सापडल्यास पालक किंवा वाहन मालकाला 5000 रुपयांपर्यंत दंड आणि कायदेशीर कारवाई होऊ शकते. सुरक्षित ड्रायव्हिंगसाठी नियम पाळा. आरटीओशी संपर्क साधून तुम्हाला अधिक माहिती मिळू शकेल.

# भटक्या कुत्र्याचा लहान मुलावर हल्ला

**■श्रीवर्धन। प्रतिनिधी,**

राज्यातल्या रायगड जिल्ह्यातील श्रीवर्धनमध्ये भटक्या कुत्र्यांची समस्या दिवसागणिक गंभीर होऊ लागली आहे. ताज्या घटनेत श्रीवर्धन शहरात भटक्या कुत्र्याने लहान मुलावर हल्ला केला. काही दिवसांपूर्वी महिलेच्या अंगावर भटक्या कुत्र्यांच्या टोळीने उडी मारली आणि चावा घेतला होता. श्रीवर्धनमध्ये भटक्या कुत्र्यांची पैदास वाढली आहे. संपूर्ण श्रीवर्धनमध्ये शेकडो मोकाट भटके कुत्रे फिरत आहेत. प्रत्येक पाखाडी, आळीत टोळक्याने बसलेले भटके कुत्रे नागरिक, विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिकांच्या मागे जात हातातील वस्तू ओढणे तसेच चावा घेण्याचा प्रयत्न करणे असे प्रकार करू लागले आहेत. यामुळे स्थानिक त्रस्त आहेत. रस्त्यावरून एकट्याने जात असलेल्याच्या अंगावर उडी मारून चावण्याचे प्रकार वाढले आहेत. श्रीवर्धन तालुक्यात वर्षभरात १८७ जणांना कुत्रा चावण्याचे प्रकार घडले आहेत. यामुळे नागरिकांमध्ये भीती पसरली आहे. श्रीवर्धन नगर परिषदेने भटक्या कुत्र्यांचे निर्बिजीकरण, शस्त्रक्रिया करण्याची मोहीम अनेक वर्षापासून रखडल्याने दरवर्षी श्वानांची संख्या वाढती आहे. नगरपरिषद हद्दीत प्रत्येक नाका, चौकात श्वानांचे टोळके दिसून येते.श्रीवर्धन नगर परिषदेमार्फत भटक्या कुत्र्यांचे निर्बिजीकरण करणे व शस्त्रक्रिया करणे याबाबतीत जाहीर निविदा प्रसिद्ध करण्यात आली होती; परंतु कुठलीही प्राणिमित्र संघटना अथवा अनिमल वेल्फेअर एजन्सीने याबाबतीत पुढाकार घेतला नाही. मोकाट श्वान पकडण्यासाठी प्रशिक्षित कर्मचारी, त्यांना रेबीज लसीकरण करणे, निर्बिजीकरण करणे यासाठी नव्या निविदा काढण्यात येणार आहेत.

# विद्यार्थिनीला केबिनमध्ये बोलवत प्राध्यापकानं ओलांडली मर्यादा

**■कोल्हापूर। प्रतिनिधी,**

कोल्हापूरच्या के आय टी कॉलेजमध्ये प्राध्यापकांकडून विद्यार्थिनीशी अश्लील वर्तन करण्यात आल्याची धक्कादायक घटना नुकतीच समोर आली आहे. जिथं प्राध्यापकानं विद्यार्थिनीला वर्गात 'टार्गेट' करत केबिन मध्ये बोलवून तिच्याशी अश्लील वर्तन केल्याची खळबळजनक घटना समोर आली. सदर घटनेनंतर गोकुळ शिरगाव पोलीस ठाण्यात प्राध्यापक सौरभ जोशीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

**विद्यार्थिनींशी गैरवर्तनाचा पाढा...**

एकाच नव्हे तर, चार ते पाच विद्यार्थिनींशी सौरभ जोशीनं गैरवर्तन केल्याची माहिती या प्रकरणानंतर उघडलीस आली असून नामवंत अशा के आय टी महाविद्यालयातील या घटनेनं कोल्हापूरात खळबळ माजली आहे.

**मागील काही दिवसांपासून सुरू होता हा अश्लील प्रकार...**

प्राथमिक माहितीनुसार गेल्या काही दिवसांपासून प्राध्यापक आपल्याशी अशा प्रकारे गरवर्तन करत होता ज्यामुळं या वर्तणुकीला वैतागून अखेर विद्यार्थिनीनं पोलिसांत धाव घेत सदर प्रकरणी तक्रार नोंदवली, ज्यामुळं कोल्हापुरच्या शैक्षणिक क्षेत्रातही यामुळं एकच खळबळ माजली.

**काय आणि कसा घडला हा प्रकार?**

अश्लील वर्तन करणाऱ्या या प्राध्यापकाचं नाव सौरभ जोशी असं असून, वर्गात शिकवत असताना त्यानं काही विद्यार्थिनींना जाणीवपूर्वक 'टार्गेट' करण्यास सुरुवात केली. अभ्यासाच्या किंवा कामाच्या बहाण्यानं तो विद्यार्थिनींना केबिनमध्ये बोलवून तिथं कोणीही नसल्याचा फायदा घेत त्यांच्याशी अश्लील वर्तन करायचा. तरुणीनं तक्रारीमध्ये यासंदभार्तील माहिती दिली असून आरोपीनं एका नव्हे तर चार ते पाच विद्यार्थिनींशी गैरवर्तन केलं.

मुळची पंढरपूरची असणारी ही तरुणी कोल्हापूरात शिक्षणासाठी आली असून, एलओडी असणाऱ्या प्राध्यापकांनी तिच्याशी गैरवर्तन केल्याचा हा प्रकार घडला. अधिकृत माहितीनुसार 20 जानेवारी रोजी आरोपी त्यांच्या वर्गात शिकवण्यासाठी आला आणि तिथं त्यानं अचानकच तिच्यावर प्रश्नांचा भडीमार सुरू केला, त्याच्या काही प्रश्नांना विद्यार्थिनींना उत्तरं देता आली नाहीत. इथंच न थांबता त्या विद्यार्थिनीला अभ्यासासंदर्भात विचारपूस करण्याच्या बहाण्यानं त्यानं केबिनमध्ये बोलवलं जिथं त्यानं पीडितेशी जवळीक साधण्याचा प्रयत्न केला.



**'क्लोज फ्रेंडसारखं वागव...'**
आरोपी इतरही विद्यार्थिनींशी मैत्री करु पाहत होता. व्यायाम करत जा, मेडिटेशन करत जा, मला मेसेज करत जा असे निरोप तो या मुलींना देत असे. अडचणी आल्या तर मला सांगत जा म्हणत तो तक्रारदार पीडितेशी जवळीक साधण्याचा प्रयत्न करत असो. 'मला जवळच्या मित्रासारखा वागव गं' असं म्हणत अश्लील चाळे करण्याचा प्रयत्न आरोपीनं केल्याचंही पीडितेनं तक्रारीमध्ये म्हटलं. केबिनमध्ये बोलवल्यानंतर त्यानं पीडितेचा मिठी मारण्याचा प्रयत्न केला. तिथं आरोपीवर ओरडून पीडिया घटनास्थळावरून निघाली. पण, तरीही आरोपी तितक्यावरच थांबला नाही. तो पीडितेचा वर्गात टार्गेट करू लागला, फोनवर बोलण्यासाठी त्याचा सतत दबाव असायचा. प्राध्यापकाकडून दिला जाणारा हा त्रास इतका वाढला की अखेर या तरुणीनं पोलिसांत धाव घेतली.

# अल्पवयीन मुलीचे जत्रेतून अपहरण
## औषध पाजून आळीपाळीने सामूहिक अत्याचार

**■मुंबई। प्रतिनिधी,**

एका अल्पवयीन मुलगी जत्रेत गेली होती, त्याचदरम्यान तिघांनी मिळून संबंधित मुलीवर सामूहिक अत्याचार करण्यात आला. पीडितेच्या कुटुंबीयांच्या तक्रारीवरून पोलिसांनी तीन नामांकित आणि एरा अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दखल केला आहे. पोलिसांनी तिन्ही आरोपींना चौकशीसाठी ताब्यात बोलावले आणि त्यांना अटक करत न्यायालयात हजर करण्यात आले. ही घटना उत्तर प्रदेशातील बुलंदशहर जिल्ह्यात घडली आहे.

अल्पवयीन मुलगी तिच्या कुटुंबातील महिलांसोबत गेली होती, ती झोका देखील खेळत होती. त्याचवेळी तिचे कुटुंबीय देखील झोका खेळत होते. तिच्या कुटुंबियांनी सांगितलं की, झोका खेळताना तिला चक्कर आली आणि ती तिथेच थांबली होती. त्या ठिकाणी तिच्या कुटुंबातील काही महिला आल्या आणि त्याठिकाणी मुलगी नव्हती.

कुटुंबियांनुसार, जेव्हा त्यांची मुलगी बराच वेळ सापडली नाही तेव्हा त्यांनी तिचा शोध सुरु केला. नंतर ती घटनास्थळावरून सुमारे पाच किमी अंतरावर अवस्थेत आढळून आली. पीडितेनं तिच्या कुटुंबाला या घटनेची संपूर्ण माहिती दिली. तेव्हा कुटुंबियांनी घटनास्थळी धाव घेऊन पोलिसांना घटनेची माहिती दिली होती. सुरुवातीला पोलिसांनी तक्रार नोंदवून घेतली. यादरम्यान, पोलीस आणि कुटुंबीयांच्यात देखील हमरीतुमरी झाली. संबंधित प्रकरणात पोलिसांनी गुन्हा दाखल केला. फिर्यादीच्या तक्रारीवरून तीन नामांकित आणि एका अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. तिन्ही आरोपीविरुद्ध चौकशी केल्यानंतर अटक करण्यात आली. आरोपींना न्यायालयात हजर करण्यात आले होते.



**औषध पाजून आळीपाळीने अत्याचार**
आरोप असा की, यादरम्यान मुलीचं अपहरण करत तिला कारमध्ये बसवून नेल्याचा आरोप आहे. आरोपींनी मुलीला औषध पाजले किंवा श्वास घेतला आणि तिला आपल्यासोबत घेऊन गेले, असे वृत्त आहे. नंतर दोन्ही आरोपींनी आळीपाळीने तिच्यावर लैंगिक अत्याचार केला. दरम्यान, इतर दोन आरोपीही घटनास्थळी पोहोचले आणि त्यांनी पीडितेचा विनयभंग केला आणि तिच्यावर अत्याचार करण्याचा प्रयत्न केला.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४०००01४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com